वर्ष- ११ | अंक- ५ | मुंबई, मंगळवार, १७ डिसेंबर ते २३ डिसेंबर २०२४ | पृष्ठ-४ | मूल्य २/- रुपये

ठाणे आवृत्ती

मराठी साप्ताहिक

R.N.I. No. MAHMAR/2014/60133

POSTAL REGISTRATION
No.PLG/205/2022-2024

# पोलीस बातमी पत्र
## POLICE BATMI PATRA

संपादक : दिपक मोरेश्वर नाईक

PG 2 पाठदुखीपासून असा मिळवा आराम

3 → लाडक्या बहिणींच्या इमोशनवर मंत्र्यांचं प्रमोशन!

'लाडकी बहीण' योजनेच्या सर्व अर्जांची छाननी वाढत्या तक्रारींच्या पार्श्वभूमीवर आदिती तटकरेंची घोषणा ← 4

www.policebatmipatra.in | policebatmi | police batmi patra | policebatmipatra | policebatmipatra@gmail.com

# डॉ. दिपक मोरेश्वर नाईक यांना भारत भूषण गौरव पुरस्काराने सम्मानित

















**मुंबई:** आश्रय सामाजिक सांस्कृतिक शैक्षणिक ट्रस्टचे संस्थापक आणि पोलीस बातमी पत्रचे संपादक डॉ दिपक मोरेश्वर नाईक यांना इंटरनॅशनल ह्यूमन राईटस् च्या वतीने भारत भूषण गौरव पुरस्कार प्रदान करण्यात आला. त्यांच्या सामाजिक सांस्कृतिक शैक्षणिक आणि पत्रकारितेतील उल्लेखनीय योगदानाबद्दल त्यांचा सन्मान अंधेरी येथील मेयर हॉल येथे दि. १३.१२.२०२४ रोजी करण्यांत आला.

या समारंभाला प्रमुख पाहूणे म्हणून मिस इंडीया २०१८ प्रियंका रॉय, एसीपी सुरेखा कपीला, बालाजी टेलिफिल्मच्या श्रवणी गोस्वामी, वसोर्वा विधानसभा आमदार हरुण खान, आंतरराष्ट्रीय ह्युमन राईट्स चे संस्थापक अविनाश साकूंडे, राष्ट्रीय अध्यक्ष अफसर चाँद कुरेशी, आश्रय ट्रस्टचे संस्थापक सचिव सौ. प्रिती दिपक नाईक, उपसचिव श्री. गुरुप्रसाद दिपक नाईक फिल्म डायरेक्टर अंजन गोस्वामी, न्युज चॅनलचे कादीर अली कुरेशी, मुझिक डायरेक्टर दिलीप सेल, माजी नगरसेवक मोहसिन हैदर, बेस्ट फिल्म ॲवार्ड फिल्म डायरेक्टर मानव सोहल आदी मान्यवर उपस्थित होते.

या सन्मानाने डॉ. दिपक मोरेश्वर नाईक यांचे कार्य अधिक प्रेरणादायी ठरले असून विविध क्षेत्रातील मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन केले.

# रोजगाराचे सायबरगंडे; नोकरीच्या बहाण्याने मुंबईत वर्षभरात ४५० गुन्हे, अशी घ्या खबरदारी



**मुंबई :** सायबरचोरांनी सर्वसामान्य नागरिक आणि तपास यंत्रणांचे नाकीनऊ आणले आहेत. सायबर फसवणूकीत सर्वाधिक गुन्हे हे गुंतवणूक आणि रोजगार म्हणजेच नोकरीच्या बहाण्याने फसवणुकीचे आहेत. वर्क फ्रॉम होम, पार्टटाइम नोकरी, विदेशात नोकरी, सरकारी नोकरी अशी वेगवेगळी प्रलोभन दाखवून लाखो रूपयांची आर्थिक फसवणुकीचे सुमारे साडेचारशे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. २०२३मध्ये नोकरीच्या शोधात असलेल्या फसवणूक झालेल्यांची संख्या ४२८ इतकी होती. सायबरच्या मायाजालात अडकले जाऊ नये यासाठी नोकरीच्या शोधात असल्यांनी सतर्क राहण्याची आवश्यकता आहे. प्रत्यक्षात भेटून नोकरीच्या नावाखाली फसविण्याची गुन्हेपद्धत वर्षांनुवर्षे चालत आली आहे. यामध्ये आता आता सायबरचोरही सामील झाले आहेत. नोकरी मिळवून देण्याच्या भुलथापा देत सायबरचोर सुशिक्षित, बेरोजगारांची फसवणूक करीत आहेत. करोनाकाळात लॉकडाऊननंतर वर्क फ्रॉम होम आणि पार्टटाइम नोकरीकरण्याची संकल्पना वाढली. तेव्हापासूनच सायबरचोरांनी घरबसल्या पार्ट टाइम, फुल टाइम नोकरीची मोहिनी टाकण्यास सुरुवात केली. विविध संकेतस्थळ, समाजमाध्यमांवर जाहिरातबाजी करून केव्हाही, कुठेही असाल तरी मोबाइलमध्ये लाइक, सबस्क्राइब करा, पर्यटन स्थळे, हॉटेल्सचे रेटिंग वाढवा, वेगवेगळ्या प्रकारचे सोपे टास्क पूर्ण करा आणि हजारो रुपये मिळवा, असे सांगून आकर्षित केले जात आहे. मोबाइलवर एखादा संदेश आला की, प्रयत्न करायला काय हरकत आहे असे म्हणून लिंकवर क्लिक केले जाते किंवा संपर्क साधला जातो आणि बँक खात्यातील रक्कम नागरिक गमावून बसतात.

**साडेनऊ लाख रुपये गमावले**

विलेपार्ले पूर्वेकडील एअरपोर्ट कॉलनीमध्ये वास्तव्यास असलेल्या राघव याच्या मोबाइलवर एक संदेश आला. त्यामध्ये एक लिंक पाठविण्यात आली होती. घरबसल्या चांगले उत्पन्न मिळवायचे असल्यास लिंकवर क्लिक करून स्वतःचे प्रोफाइल तयार करा, असे संदेशात नमूद करण्यात आले होते. रोजगाराच्या शोधात असलेला राघव समोरून संधी चालत आल्याने खुश झाला. त्याने लिंकवर क्लिक करून स्वतःचे प्रोफाइल तयार करून समोरून सांगतील त्याप्रमाणे टास्क पूर्ण करीत गेला. काही रक्कम जमा झाल्यानंतर त्याला पेड टास्क चा पर्याय देण्यात आला. राघव याने थोडे थोडे करून साडेनऊ लाख रुपये गुंतविले. ज्यावेळी पैसे काढायची वेळ आली त्यावेळी समोरून संपर्क तोडण्यात आला. घरून काम करणे महागात

भायखळ्याच्या अंजीरवाडीत राहणाऱ्या बेरोजगार तरुणीला वर्क फ्रॉम होम करण्याचे आश्वासन देण्यात आले. वेगवेगळ्या संकेतस्थळावर जाऊन हॉटेलला रेटिंग देण्याचे काम देण्यात आले. घरबसल्या रोजगार मिळत असल्याने तरुणीने हे काम स्वीकारले. ती दररोज काम करायची आणि कामाचा मोबदला वॉलेटमध्ये जमा होताना दिसत होता.

तरुणीचा विश्वास बसल्याचे पाहून यामध्ये तिला गुंतवणुकीचा सल्ला देण्यात आला. वेगवेगळ्या योजनांमध्ये तिने सात लाख ६८ हजार रुपये गुंतविले. ज्यावेळी रक्कम काढण्याचा प्रयत्न केला त्यावेळी आधी काही रक्कम भरण्यास तिला सांगण्यात आले. संशय आल्याने तिने आपल्या मित्रमैत्रिणींना विचारले त्यावेळी सायबर फसवणूक झाल्याचे तिच्या लक्षात आले.

**हे लक्षात असू द्या**

घरबसल्या हजारो, लाखोचे उत्पन्न कुणी देणे शक्य नाही.

अनोळखी क्रमांकावरील संदेशला प्रतिसाद देऊ नका.

संदेशातील लिंकवर क्लिक किंवा क्रमांकावर संपर्क साधू नका.

समाजमाध्यमांवरील आकर्षक जाहिरातींना भुलू नका.

ॲनी डेस्क, क्विक सपोर्ट, टीम व्ह्यूअर ॲप डाउनलोड करू नये.

कोणत्याही लिंकवर, ग्रुपमध्ये बँक खात्याचा तपशील देऊ नका.

पेड टास्कसाठी स्वतःकडील पैसे गुंतवू नका.

फसवणूक झाल्यास १९३० या हेल्पलाइनवर संपर्क करा.

जवळच्या पोलिस ठाण्यात किंवा सायबर पोलिसांकडे तक्रार करा.

होय, हे ईव्हीएम सरकार! मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचं विरोधकांना जोरदार प्रत्युत्तर

| नोकरी फसवणूक वर्ष | गुन्हे | उकल | अटक आरोपी |
|---|---|---|---|
| २०२१ | ११९ | १३ | ४४ |
| २०२२ | १०६ | ६ | २७ |
| २०२३ | ४२८ | ८५ | १३६ |
| २०२४ | ४३१ | ८४ | ९८ |

# खड्ड्यात पडून मृत्यूप्रकरण; बांधकाम विकासकाविषयी प्रशासन अनभिज्ञ



**नवी मुंबई :** कोपरखैरणे सेक्टर पाच येथे एका इमारतीसाठी खणलेल्या खड्ड्यात पडून ९ वर्षीय मुलाचा मृत्यू झाल्यानंतर मनपा प्रशासन खडबडून जागे झाले आहे. पोलीस आणि मनपा प्रशासनाला या इमारतीच्या विकासकाचे नावही माहिती नसल्याचे उघड झाले आहे. हे बांधकाम अनेक वर्षांपासून रखडलेले आहे. दरम्यान, बुधवारी रात्री उशिरा या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

अंकित ठनूगा, वय वर्ष ९ असे मृत विद्यार्थ्यांचे नाव आहे. सेक्टर ५ मध्ये हे इमारत बांधकाम सुरू होते. या ठिकाणी खणलेल्या खड्ड्यातील पाण्यात पडून त्याचा मृत्यू झाला. ज्या ठिकाणी घटना घडली त्यापासून हाकेच्या अंतरावर असणाऱ्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर झोपडपट्टीत तो राहत होता. घरात एकुलता एक असल्याने या घटनेने केवळ कुटुंबीयच नव्हे तर परिसरातील नागरिक सुन्न झाले आहेत. मुलाचा मृत्यू ही घटना बुधवारी संध्याकाळी साडे सहाच्या सुमारास उघडकीस आली. इमारत बांधकाम वेळी चारही दिशेला पत्रे बांधणे सुरक्षा रक्षक ठेवणे विहित वेळेत काम पूर्ण करणे या तिन्ही नियमांना हडताळ फासले असल्याची स्थिती आहे. केवळ दर्शनी भागात पत्रे लावण्यात आले आहेत तर मागच्या बाजूला केवळ लाकडी पट्ट्या रोवल्या आहेत. तेथूनच कदाचित हा मुलगा आला असावा अशी शक्यता वर्तवण्यात येत आहे. धक्कादायक बाब म्हणजे बांधकाम क्षेत्र आणि मनपा शाळा क्रमांक ३५ यांच्यात केवळ लोखंडी संरक्षक कठडा आहे. त्यालाच चिकटून खोदलेल्या खड्ड्यात अंकित याचा बुडून मृत्यू झाला आहे. या घटने प्रकरणी कोपरखैरणे पोलीस ठाण्यात केनी नावाच्या व्यक्ती विरोधात निष्काळजी पणा केल्याने एकाच्या मृत्यूस कारण कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मुलाच्या मृत्यूला कारण नेमके कोण आहे त्या व्यक्तीच्या पूर्ण नावाचा तपास करून त्या व्यक्तीवर कारवाई कारवाई करण्यात येणार असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

**वाचविण्याचा प्रयत्न निष्फळ**

ज्या ठिकाणी बांधकाम सुरू आहे त्याच्या दोन बाजूला इमारती एका बाजूला मनपा शाळा क्रमांक ३५ तर एका बाजूला रस्ता आहे. मुलगा बुडत असतानाच जवळच्या एका इमारतीत राहणाऱ्या महिलेचे लक्ष गेले. तिने आरडाओरडा केला. त्यावेळी लोक जमा झाले मात्र तोपर्यंत तो बुडाला होता. नजिकच्या हॉटेल मधील एका कामगाराने धाडस करून त्याला बाहेर काढले, अशी माहिती प्रत्यक्षदर्शी व्यक्तीने दिली.

घटनेबाबत सविस्तर माहिती घेऊन अहवाल तयार करण्याचे काम सुरू आहे. हा अहवाल वरिष्ठांना सादर करून त्यांच्या निदेर्शानुसार कारवाई करण्यात येईल.झ डॉ, कैलास गायकवाड, उपायुक्त परिमंडळ २

# व्यापारचिन्ह हक्क उल्लंघनाचे प्रकरण : पतंजलीला उच्च न्यायालयाचा दिलासा, साडेचार कोटी रुपयांचा दंडाच्या आदेशाला स्थगिती



मुंबई : मंगलम् ऑरगॅनिक्स लिमिटेडने दाखल केलेल्या व्यापारचिन्ह हक्क (ट्रेडमार्क) उल्लंघनाप्रकरणी साडेचार कोटी रुपयांचा दंड भरण्याच्या एकलपीठाने पतंजलीला दिलेल्या निर्णयाला उच्च न्यायालयाच्या द्विसदस्यीय न्यायमूर्तीच्या खंडपीठाने सोमवारी स्थगिती दिली.उच्च न्यायालयाच्या अंतरिम आदेशाचे पतंजली आयुर्वेद लिमिटेडने हेतुतः उल्लंघन केल्याचा ठपका उच्च न्यायालयाच्या एकलपीठाने जुलै महिन्यात कंपनीवर ठेवला होता, तसेच, पतंजलीला साडेचार कोटी रुपयांचा दंड सुनावताना ती रक्कम न्यायालयात जमा करण्याचे आदेश दिले होते. पतंजलीने एकलपीठाच्या या निर्णयाला खंडपीठासमोर आव्हान दिले होते. न्यायमूर्ती अतुल चांदूरकर आणि न्यायमूर्ती राजेश पाटील यांच्या खंडपीठाने सोमवारी कंपनीच्या याचिकेवर निर्णय देताना एकलपीठाच्या आदेशाला स्थगिती दिली. त्याचवेळी, साडेचार कोटी रुपयांच्या दंडाच्या रकमेपैकी ५० लाख रुपयांची रक्कम न्यायालयातच जमा राहणार असल्याचेही न्यायालयाने यावेळी स्पष्ट केले. दरम्यान, मंगलम् ऑरगॅनिक्सने पतंजलीविरुद्ध न्यायालयात धाव घेऊन कापूर उत्पादनांच्या स्वामित्व हक्कांचे उल्लंघन केल्याचा दावा केला होता. या दाव्याची दखल घेऊन न्यायालयाने ३० ऑगस्ट २०२३ रोजी पतंजलीला कापूर उत्पादने विकण्यापासून मज्जाव केला होता. त्यानंतरही, पतंजलीकडून कापूर उत्पादनांची विक्री सुरू असल्याचा दावा करून मंगलम् ऑरगॅनिक्सने पुन्हा उच्च न्यायालयात धाव घेऊन पतंजलीविरोधात अवमान याचिका केली होती. त्यानंतर, पतंजलीने २ जून रोजी प्रतिज्ञापत्राद्वारे न्यायालयाची माफी मागितली आणि न्यायालयाच्या आदेशांचे पालन करण्याचे आश्वासन दिले.

तथापि, पतंजली आयुर्वेदाचे संचालक रजनीश मिश्रा यांनी प्रतिज्ञापत्रात कंपनीने न्यायालयाच्या अंतरिम आदेशाचे उल्लंघन केल्याची बाब कबूल केली होती. न्यायालयाच्या मनाई आदेशानंतर ४९,५७,८६१ रुपयांची कापूर उत्पादने विकली गेली. तसेच, २५,९४,५०५ रुपये किमतीची कापूर उत्पादने अद्याप घाऊक विक्रेते किंवा वितरक आणि अधिकृत दुकानांत पडून असल्याचेही प्रतिज्ञापत्राद्वारे मान्य केले होते. आदेशाचे उल्लंघन केल्याच्या पतंजलीच्या कबुलीची न्यायालयाने दखल घेतली. तसेच, पतंजलीने आदेशानंतर ८ जुलै रोजी कापूर उत्पादने विकली. कंपनीच्या संकेतस्थळावरूनही कापूर उत्पादन विक्रीसाठी सूचीबद्ध केल्याचे न्यायालयाने म्हटले. त्याचप्रमाणे, कापूर उत्पादन विक्रीस प्रतिबंध करणाऱ्या अंतरिम आदेशाचे हेतुतः आणि जाणूनबुजून उल्लंघन केल्याप्रकरणी न्यायमूर्ती रियाज छागला यांच्या एकलपीठाने पतंजलीला ५० लाख रुपये जमा करण्याचे आदेश दिले होते. आदेशाची पायमल्ली करण्याचा पतंजलीचा हेतूबद्दल आपल्या मनात तीळमात्र शंका नसल्याचेही पतंजलीचे सर्व दावे फेटाळताना एकलपीठाने प्रामुख्याने नमूद केले होते.

# शेअर प्रमाणपत्र हरवले आहे

शिवहाइट्स को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लिमिटेड फ्लॅट क्रमांक ७०१, सेक्टर १३, खारघर, नवी मुंबई - ४१०२१०

सूचना देण्यात येत आहे की मूळ शेअर प्रमाणपत्र क्रमांक NBOM/CIDCO/HSG/(TC)/4946/JTR/YEAR 2012-2013 दिनांक. 21/03/2013 शेअर्स 10 .क्रमांक 461 ते 470 जे फ्लॅट क्रमांक ७०१, शिव हाइट्स सीएचएस, सेक्टर १३, खारघर, नवी मुंबई याच्या नावावर श्री अवतार सिंग (विक्रेता) यांच्या नावावर आहे, ते हरवले/गहाळ झाले असल्याची नोंद आहे. या संदर्भात तारापूर पोलीस ठाण्यात तक्रार क्रमांक. 0449/2024 दिनांक 09/12/24 दाखल करण्यात आला आहे. तसेच, श्रीमती स्मिता संदीप ठाकूर (खरेदीदार) यांनी सोसायटी कडे डुप्लिकेट शेअर प्रमाणपत्र देण्याबाबत अर्ज केला आहे.

सोसायटी कडून डुप्लिकेट शेअर प्रमाणपत्र देण्याबाबत कोणतीही दावा किंवा हरकती (लेखी स्वरूपात) या नोटिस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत सादर करण्याचे आवाहन करण्यात येत आहे. जर या कालावधीत कोणताही दावा/हरकत प्राप्त झाली नाही, तर समाजाला डुप्लिकेट शेअर प्रमाणपत्र देण्याचा अधिकार असेल.

# कच्ची केळी खाण्याचे फायदे

**वजन होते कमी :** वजन कमी करण्यासाठी रोज एक कच्चे केळे खायचा सल्ला डॉक्टर देतात. केळ्यामध्ये असलेल्या फायबर्समुळे शरीरातील अनावश्यक फॅट सेल्स काढून टाकायला मदत होते.

**बद्धकोष्ठतेच्या समस्येवर उपाय :** कच्च्या केळ्यामध्ये असलेल्या फायबर आणि स्टार्चमुळे बद्धकोष्ठतेची समस्या दूर होते.

**भुकेवर ताबा मिळवण्यासाठी :** कच्च्या केळ्यांमधील फायबर, इतर पोषक गुणांमुळे भुकेवर ताबा मिळवता येतो. कच्ची केळी खाल्ल्यामुळे लागणारी भूक नियंत्रणात येते. जंकफूडपासून वाचता येऊ शकते.



**पचन प्रक्रिया होते चांगली :** कच्ची केळी खाल्ल्यामुळे पचन प्रक्रिया चांगली होण्यास मदत होते. कच्च्या केळ्यामुळे कॅन्सरचा धोकाही कमी होतो. यातील कॅल्शिअममुळे हाडे मजबूत होतात.

**डायबिटीसवर नियंत्रण –**
तुमचा डायबिटीस प्राथमिक स्टेजमध्ये असेल तर कच्ची केळी खायला सुरुवात करा. कच्च्या केळ्यामुळे डायबिटीस नियंत्रणात यायला मदत होते.

# केसांचे आरोग्य

हेल्थ कॉन्शस पण ज्ञान मात्र जाहिरातीतून मिळवलेले, अशा विचित्र परिस्थितीला आपण सध्या सामोरे जात आहोत. जगन्मान्य असलेली 'फॅमिली डॉक्टर' ही संकल्पनाही आता जवळजवळ अस्तित्व हरवून बसलेली. अशावेळी किरकोळ आजारासाठी अथवा काही आरोग्यदायी सल्ल्यांसाठी काही माहिती लागली तर ती कुठे मिळवायची? असा प्रश्न येतो.

फार पूर्वीपासून भारतीय संस्कृतीत किरकोळ आजारांसाठी आजीबाईचा बटवा महत्त्वाचे स्थान मिळवून होता. आता आजीच घरात असणे अवघड, तर बटवा कुठून मिळायचा? पण आजही अगदी घरातच असणाऱ्या साध्यासाध्या पदार्थांपासून किरकोळ उपचार कसे करायचे याचे मार्गदर्शन देण्याचा हा प्रयत्न. यातील उपचार प्रसिद्ध आयुर्वेदाचार्य श्रीकांत बागेवाडीकर यांना विचारून घेतले आहेत.



केस हा साऱ्यांच्याच जिव्हाळ्याचा विषय. केसांमुळे माणसाच्या व्यक्तिमत्त्वाला एक प्रकारची ओळख मिळत असते. विशेषतः महिलावर्गाला ही ओळख जास्त महत्त्वाची असते. केस कुणाच्याही सौंदर्यात कशी भर घालतात हे काही सांगायला नको. मात्र या केसांची निगा आणि काही तक्रारी असल्यास त्या दूर करणे हे मोठे कामच होऊन बसते. अशा वेळी हे छोटे छोटे उपाय नक्कीच फायद्याचे ठरतात. चटकन करता येणारे हे उपाय करून पाहावेत असेच आहेत.

**केस पांढरे होणे –**
१०० ग्रॅम खोबरेल तेलात २० ते २५ लाल जास्वंदीची फुले मंद आचेवर तळून काढावीत. पाण्याचा अंश गेला की फुलांसकट तेल गार होऊ द्यावे व मग गाळून बाटलीत भरावे. हे तेल आठवड्यातून किमान दोन वेळा केसांना लावावे.जास्वंद हा उत्तम नैसर्गिक डाय असून त्याचे इंग्रजी नाव 'शू फ्लॉवर ' असे आहे. पूर्वीच्या काळी ही फुले बुटांना पॉलिश करण्यासाठी वापरली जात असत.

# दही; स्वादिष्ट आणि आरोग्यदायी

दह्यामध्ये दुधापेक्षा अधिक प्रमाणात प्रथिने आणि जीवनसत्त्वे असतात, तसेच दुधाच्या मानाने दही पचण्यास जास्त हलके असते. दह्याच्या सेवनाने पचनशक्ती चांगली राहते. याशिवाय आपल्या शरीरासाठी आवश्यक असलेली अनेक पोषक तत्त्वे दह्यामध्ये आहेत. दही हे प्रथिनांचे प्रमुख स्रोत असून, ही प्रथिने दुधात असलेल्या प्रथिनांच्या मानाने पचवण्यास हलकी असतात. ज्या व्यक्तींना दुधामध्ये असलेल्या लॅक्टोज या तत्त्वाची ॲलर्जी असते, त्या व्यक्तींना दही खाण्याचा सल्ला आहारतज्ज्ञ देतात. दुधाचे दह्यामध्ये परिवर्तन होत असताना, दुधातील लॅक्टोजचे लॅक्टिक ॲसिडमध्ये रूपांतर होत असते. त्यामुळे ज्यांना दूध पचत नाही, त्यांनी दह्याचे सेवन नियमित करावे.



**दह्यामध्ये** असलेल्या कॅल्शियम आणि रिबोफ्लाविन या घटकांमुळे शरीरातील हाडांचा, ओस्टियोपोरोसीस सारख्या व्याधीपासून बचाव होतो. या व्याधीने ग्रस्त असलेल्या व्यक्तींनी दिवसातून किमान एकदा तरी दह्याचे सेवन अवश्य करावयास हवे, असे आहारतज्ज्ञांचे मत आहे. दह्यामध्ये अनेक रोगांवर मात करणारी गुणकारी तत्त्वे आहेत. पोटाशी निगडित विकार असणाऱ्यांनी दह्याचे सेवन करावे. जुलाब किंवा बद्धकोष्ठता यापैकी कशाचाही त्रास होत असल्यास दह्याच्या सेवनाने आराम पडतो. दह्यामध्ये असलेल्या लॅक्टोबॅसिली नामक बॅक्टेरियामुळे पोटाशी निगडित विकार बरे होण्यास मदत मिळते. दह्याच्या सेवनाने कोलनचे आरोग्यही चांगले राहते. मोठ्या आतड्याच्या मुख्य आणि सर्वात लांब भागाला कोलन म्हणतात. दह्याच्या नियमित सेवनाने दह्यातील बॅक्टेरियामुळे कोलनचे आरोग्य सुधारून, कोलनचा कर्करोग होण्याची संभावना कमी होते. याशिवाय त्वचेशी निगडित समस्यांमध्ये ही दही किंवा ताकाचे सेवन करण्याचा सल्ला दिला जातो. दह्याने किंवा ताकाने पोटामध्ये शीतलता जाणवते. त्यामुळे सतत खाज सुटणे, त्वचेवर लाल चट्टे उठणे, अंगाची आग होणे, या तक्रारी पुष्कळ प्रमाणात कमी होतात. तसेच निद्रानाश असलेल्या व्यक्तींनी रात्री झोपताना दह्याने डोक्याची मालिश करावी व आपल्या आहारात दह्याचा नियमित समावेश करावा. दह्यामध्ये गूळ मिसळून खाल्ल्यास कामोत्तेजना वाढते. वजन घटवण्याची इच्छा असणाऱ्या व्यक्तींनी लो-फॅट दह्याचे सेवन करावे. दह्यामध्ये झिंक, कॅल्शियम, जीवनसत्त्व बी१, बी२, बी६, आणि यीस्ट ही तत्त्वेही असतात. झिंक असल्याने दह्यामध्ये ॲंटी इंफ्लेमेटरी गुण आहेत. त्यामुळे त्वचेवरील मुरुमे कमी होण्यास मदत होते. तसेच दह्यामध्ये असलेली एन्झाइम्स त्वचेला आर्द्रता देतात, त्वचेवरील रंध्रांचा आकार कमी करतात, आणि त्वचा मुलायम, सतेज बनवतात. दही केसांच्या आरोग्यासाठी देखील अतिशय फायदेशीर आहे.

# आठ वर्षांखालील मुलांना देऊ नका चहा-कॉफी

## आरोग्यावर होतील 'हे' गंभीर परिणाम

लहान मुलांसमोर मोठी माणसं जेव्हा चहा-कॉफी पितात, तेव्हा त्यांनाही चहा-कॉफी पिण्याची इच्छा होते. अशा वेळी तू लहान आहेस, असे सांगून मोठी माणसे लहान मुलांना चहा-कॉफी देण्यास टाळाटाळ करतात. मात्र काही जण मुलांच्या हट्टापुढे गुडघे टेकून त्याला चहा-कॉफी देतात आणि मग हळूहळू त्यांना त्याचे व्यसन लागते. पण तुम्हाला माहीत आहे की, आठ वर्षांखालील लहान मुलांना चहा-कॉफी दिल्यास त्यांच्या शरीरावर फार गंभीर परिणाम होऊ शकतात.

तसे पाहता जंकफूड, शीतपेय आणि चहा-कॉफी या तिन्ही गोष्टी लहान मुलांच्या शरीरास खूपच घातक आहेत. तज्ज्ञांच्या म्हणण्यानुसार, कॉफीमध्ये भरपूर प्रमाणस कॅफीन असते. हा पदार्थ खूपच उत्तेजक असल्यामुळे तो लहान मुलांच्या शरीरास अपायकारक आहे. त्यामुळे त्यांना वेगवेगळे आजार होऊ शकतात.

**लहान मुलांना चहा-कॉफी दिल्यास होऊ शकतात हे परिणाम**

- लहान मुलांना पोटदुखीच्या समस्येला सामोरे जावे लागू शकते.
- चहा-कॉफी प्यायल्याने त्यांना झोप लागत नाही.
- लहान मुलांच्या हृदयाचे ठोके वेगाने होतात.
- तसेच खूप कमी वयात त्यांना डोकेदुखीची समस्या उद्भवू शकते.
- शक्यतो लहान मुलांना आठ वर्षांनंतर आणि जमल्यास १६ वर्षांनंतर चहा-कॉफी देणे अधिक चांगले. जमेल तितके त्यांना चहा-कॉफीपासून दूर ठेवा आणि त्यापेक्षा फायद्याचे आणि पोषक असे दूध रोज प्यायला द्या.

जर तुम्ही तुमच्या मुलांना कोल्ड्रिंक्स, कॉफी, फ्लेव्हर्ड फ्रुट ड्रिंक्स यांपासून दूर ठेवला नाहीत तर त्यांच्या शरीरावर त्याचा विपरित परिणाम होऊ शकतो. यात काहींना खूप त्वरित तर काही काही काळानंतर अनेक गंभीर परिणामांना आणि आजारांना सामारे जावे लागू शकते.



# पाठदुखीपासून असा मिळवा आराम



आजकालच्या धावत्या युगाला अनुसरून बदललेली आपली जीवनशैली, असंतुलित आहार, जेवण्याचे अनियमित असणारे वेळापत्रक, व्यायामाचा अभाव आणि काम करताना किंवा एरवीही खुर्चीवर बसतानाची चुकीची पोझिशन किंवा स्थिती या सगळ्यांमुळे आपल्यापैकी बहुतेकांनी पाठदुखीची तक्रार कधी ना कधी अनुभवलेली असते. एकदा पाठदुखी सुरू झाली की मग रोजची लहानसहान कामे करणे देखील अशक्यप्राय होऊन बसते. काही प्राथमिक औषधोपचारांनी तात्पुरता आराम मिळत असला तरी या औषधांचा परिणाम ओसरला की पाठदुखी पुनश्च सुरू होते. तसेच फार काळ जर पेन किलर्सचा वापर केला गेला, तर त्याचेही दुष्परिणाम जाणवू लागतात. परिणामी, पाठदुखीच्या जोडीने ॲसिडिटी, शरीरामध्ये उष्णता वाढून सतत तोंड येणे, असल्या नव्या तक्रारी सुरू होतात. त्यामुळे पाठदुखीच्या त्रासातून मुक्तता मिळवण्याकरिता शक्यतो नैसर्गिक आणि सुरक्षित उपायांचा वापर करणे कधीही चांगले.

हर्बल किंवा आयुर्वेदिक तेलांनी केलेला मसाज पाठदुखीसाठी चांगला आहे. घरच्या घरी मसाज करण्यासाठी निलगिरी, मोहरी, किंवा नारळाच्या तेलाचा वापर केला जाऊ शकतो. तेल थोडे गरम करून घेऊन मग त्याने मसाज करावा. त्यानंतर थोड्या वेळाकरिता तेल तसेच राहू देऊन, मग गरम पाण्याने स्नान करावे. आजकाल बाजारामध्ये खास मसाजसाठी अनेक प्रकारची आयुर्वेदिक व हर्बल तेल उपलब्ध असतात. पण वैद्यकीय सल्ल्यानुसारच या तेलांचा वापर करावा. पाठदुखीसाठी तेलाचा मसाज आवश्यकता असेल तर दररोज करावा.


हळदीमध्ये असलेल्या 'कुकुर्मीन' या तत्त्वामुळे अंगावरील सूज कमी होऊन अंगदुखीपासून आराम मिळतो. त्यामुळे पाठदुखी सतावत असल्यास दररोज एक ग्लास दुधामध्ये पाव चमचा हळद घालून प्यावे. आवश्यकता वाटल्यास दुधामध्ये अर्धा चमचा मध चवीकरिता घालावा. त्याचप्रमाणे मॅग्नेशियम सल्फेटमुळे (यालाच इप्सम सॉल्ट असेही म्हणतात) ही अंगावरील सूज कमी होण्यास मदत मिळते. याच्या वापराने रक्ताभिसरण सुधारून, अंगदुखी कमी होते.

अंघोळीच्या गरम पाण्यामध्ये हे इप्सम सॉल्ट घालून ते पाणी पाठीवर घेत पाठ शेकून काढावी. आल्याचा वापर केल्यानेही अंगावरील सूज व दुखणे कमी होण्यास मदत होते. दीड कप पाण्यामध्ये आल्याचे काही तुकडे घालून हे पाणी उकळून घ्यावे. दिवसभरात हे पाणी थोडे-थोडे करून तीन ते चार वेळा प्यावे.

बर्फाची पिशवी पाठीवर फिरवल्यानेही पाठीवर सूज असल्यास ती कमी होऊन पाठदुखी कमी होते. जर बर्फाची पिशवी नसेल, तर एखाद्या जाडसर टॉवेलमध्ये बर्फ घेऊन तो बर्फ पाठ दुखत असलेल्या ठिकाणी पंधरा ते वीस मिनिटे फिरवावा. पाठदुखीमध्ये गरम पाण्याच्या पिशवीचा शेक घेतल्यानेही आराम मिळतो.

# ओपनफेस सँडविच

**तेच** तेच पदार्थ खाऊन कंटाळा येतो. खास करून मुलांच्या डब्यात काय पदार्थ द्यावे हे सुचत नाही. पोळीभाजी नको, पराठे खाऊन कंटाळा आला, सँडविच काय तेच तेच.. मग असे करायचे की हे पदार्थ वेगळ्या रूपात द्यायचे. आता सँडविच. नेहमीचे कसे असते, बटाटा, चटणी, काकडीबरोबर नाही का! मग सँडविचला वेगळे रूप द्यायचे. नेहमीचे सँडविच बंद असते, हे ओपनफेस ठेवायचे.



**साहित्य** – उकडलेला बटाटा, सिमला मिरची, गाजर, फरसबी, चाट मसाला, चिली फ्लेक्स, जिरे पूड, लसूण, मीठ, लिंबू, ब्रेड, चिझ किंवा बटर.

**कृती** – उकडलेला बटाटा किसून त्यात हवी तर सिमला मिरची, गाजर, फरसबी काहीही घाला. मात्र अत्यंत बारीक चिरून. आता यात हवा तो मसाला टाका. चाट मसाला, ड्राय हॅर्ब्स, चिली फ्लेक्स, जिरे पूड, लसूण, मीठ, लिंबू रस चांगले एकत्र केले की ब्रेडचे लांबट तुकडे करा. त्यावर हे मिश्रण थापा. वरून चीझ किसून घाला अथवा थोडे बटर घाला. साधारण ग्रील करा किंवा तव्यावर शेकवून द्या. हे सँडविच मेयो किंवा चटणीसोबत खायला द्या.

## वॅक्सिंगऐवजी शेव्हिंगचा पर्याय वापरत असाल तर या गोष्टी ठेवा लक्षात

# शरीरावर जाड केस येणे होईल नाहीसे



**आता लवकरच उन्हाळा सीझन सुरू होईल, समर वाइब्सनुसार आपणही शॉर्ट्स, क्युट ड्रेसेस घालून बाहेर पडण्याच्या विचारात असाल, अशावेळी पायावर जाड केस असले तर असे कपडे कसे घालू? असा प्रश्नही तुम्हाला साहजिक पडेलच. मग अगदी आयत्या वेळी पार्लरमध्ये जाण्याऐवजी आपण घरीच रेझर घेऊन शेव्हिंगचा पर्याय निवडाल, वास्तविक यात काही हरकत नाही, मात्र अनेकदा शेव्हिंगमुळे पुन्हा अंगावर येणारे केस हे नियमित लवेपेक्षा जाडसर येतात आणि पुढच्या वेळी हेच केस पुन्हा काढून टाकताना त्वचेला त्रास होतो. असं होऊ द्यायचं नसल्यास तुम्हाला शेव्हिंगवेळी फक्त काही सोप्या टिप्स लक्षात ठेवण्याची गरज आहे. अनेक महिलांना वॅक्सिंगमुळे त्रास होतो, तर हेअर रिमूव्हल क्रीम्समुळे त्वचा काळवंडते, असाही काहींचा अनुभव असतो, यावर पर्याय म्हणून रेझरचा वापर हा त्यातल्या त्यात सेफ म्हणता येईल. फक्त रेझर योग्य पद्धतीने वापरला जातोय का, याकडे लक्ष देणे गरजेचे आहे. ही योग्य पद्धत कोणती आणि शेव्हिंग करताना कोणत्या गोष्टी लक्षात ठेवावयाच्या, हे जाणून घ्या..**



**कसा वापराल रेझर?**
रेझर फिरवताना ज्या दिशेने केस येतात त्या दिशेनेच फिरवा, यामुळे केस मुळासकट निघून जायला मदत होते आणि पुढील वेळेस जाड केस येत नाहीत. रेझर फिरवताना दुखापत होईल इतका जोर लावू नका. हात, पाय, अंडरआर्म्स, गुप्तांग अशा सर्वच ठिकाणी एकच रेझर वापरू नका. ब्लेड चेंज करणारे रेझर वापरत असाल तर एखादे ब्लेड तीन ते जास्तीत जास्त चार वेळा वापरा. त्यावर नको. शेव्हिंग प्रोसेस सोपी करतील असे मार्ग -

- जो भाग शेव्ह करायचा आहे तो पाण्याने भिजवा यामुळे केस नरम होतील.
- हात किंवा पाय, अंडरआर्म्स, प्रायव्हेट पार्टवरील केस काढायचे असतील तरी आधी त्यावर कमी केमिकल्स असलेले शेव्हिंग फोम वापरा, मगच केसांवर रेझरचा वापर करा. यामुळे केस नरम होतात आणि पटकन निघून जातात.
- शेव्हिंग केल्यानंतर तुमच्या त्वचेची छिद्रे उघडतात. त्यात धूळ जाऊ नये किंवा कोरडेपणा येऊ नये, रेडनेसचा त्रास होऊ नये म्हणून चांगले मॉइश्चरायझर त्वचेला लावा.
- शेव्ह केल्यानंतर आधी तुम्ही तुमच्या अंडरआर्म्सला ॲलोवेरा जेल किंवा बर्फ लावा. बेबी पावडरने जळजळ होत असल्यास लगेच थांबते.

## मिठाई बनवताना साखरेऐवजी

# वापरा खजुराची पेस्ट

आपल्या दैनंदिन आहारामध्ये साखरेचा वापर होत असतो. चहा, कॉफी, आणि मुख्य म्हणजे आपल्या आहारातील बहुतेक सर्वच गोड पदार्थांमध्ये साखरेचा वापर नियमित केला जात असतो. केवळ घरी तयार करण्यात आलेल्या पदार्थांतच नव्हे, तर ब्रेड, बिस्किटे, तयार सॉसेस, सँडविच स्प्रेड्स, पॅकेज्ड फळांचे रस, कोल्ड ड्रिंक्स यांमध्येही साखरेचे प्रमाण जास्त असते. रिफाईन्ड साखर अतिप्रमाणात खाल्ल्याने आरोग्याला धोका निर्माण होत असून, तरुण वयातच उच्च रक्तदाब, मधुमेह, इत्यादी विकार उद्भवण्याचे प्रमाण वाढले आहे.



**आहारामध्ये** साखर जास्त असल्याने चेहऱ्यावर अकाली सुरकुत्या येणे, वारंवार मुरुमे, पुटकुळ्या येणे, इत्यादी लक्षणे दिसू लागतात. त्यामुळेच आहारतज्ज्ञ दैनंदिन आहारामधून साखरेचे प्रमाण कमी करून साखरेऐवजी नैसर्गिक स्वीटनर्स वापरण्याचा सल्ला देत असतात.

नैसर्गिक स्वीटनर्समध्ये अनेक पर्याय उपलब्ध असून त्यामध्ये खजुराच्या पेस्टचा समावेश करता येऊ शकतो. खजुराची विशेषता अशी की त्यामध्ये नैसर्गिक शुगर्ससोबत प्रथिने, फायबर, झिंक, मॅग्नेशियम इत्यादी क्षारही आहेत. शंभर ग्रॅम खजुरामध्ये २८२ किलो कॅलरीज इतकी ऊर्जा असते. त्यामुळे खजुरापासून तयार केली गेलेली पेस्ट किंवा सिरप रिफाईन्ड साखरेऐवजी वापरली जाऊ शकते. खजुराची पेस्ट घरच्या घरी तयार करण्यासाठी केवळ खजूर आणि स्वच्छ पाणी, इतक्याच साहित्याची आवश्यकता आहे. खजुराची पेस्ट बनवण्यासाठी ताजा पिकलेला खजूर पाण्यामध्ये भिजवून ठेवावा. खजूर भिजवण्याआधी त्याच्यातील बिया काढून टाकाव्यात. त्यानंतर गरम पाण्यामध्ये खजूर भिजवावा. हा खजूर रात्रभर पाण्यामध्ये भिजू द्यायचा आहे.

दुसऱ्या दिवशी सकाळी खजूर पाण्यातून काढून घेऊन मिक्सरवर बारीक वाटावा. खजूर भिजवून ठेवलेले पाणी टाकून न देता हे पाणी खजूर मिक्सरवर वाटत असताना घालावे. आवश्यक तितके पाणी घालून आपल्याला हवी तितकी घट्ट किंवा पातळ पेस्ट तयार करून घ्यावी.

या पेस्टमध्ये किंचित मीठ, आवडत असल्यास मध, किंवा दालचिनीची पूड मिसळता येईल. यामुळे या पेस्टला वेगळीच चव येते. खजुराचे सिरप तयार करण्यासाठी खजूर पाण्यामध्ये उकळून घ्यावेत.

त्यानंतर खजूर उकळलेले पाणी गाळून घेऊन खजुराचा गर वेगळा करावा. गाळलेले पाणी पुन्हा उकळत ठेवून पाकाप्रमाणे दिसेपर्यंत आटवावे. तयार झालेले सिरप थंड झाल्यावर बाटलीमध्ये भरून ठेवावे. खजुराच्या सिरपपेक्षा खजुराची पेस्ट अधिक चांगली, कारण या पेस्टमध्ये फायबर असते.

# जाणून घ्या फायदे मनुके खाण्याचे

**मनुके खाण्यास जेवढे स्वादिष्ट आहेत, तेवढेच अन्य ड्रायफ्रुटच्या तुलनेत स्वस्त देखील आहेत. मनुक्यांचा वापर अनेकदा गोड पदार्थांमध्ये केला जातो. याचा स्वाद पदार्थाला चवदार बनवतो. याव्यतिरिक्त मनुके खाण्याचे अनेक फायदे आहेत. हे फायदे जाणून घेऊया...**



**शरीराला ताकद मिळते –**
दररोज मनुके खाल्ल्याने शरीराला ताकद मिळते. मनुक्यात नैसर्गिक साखर असते, जी सहज पचते. यामुळे शरीराला त्वरित ऊर्जा मिळते. मनुक्यात कोलेस्ट्रॉल नसते, ज्यामुळे हृदयाची समस्या असलेल्या रुग्णांसाठी हे चांगले आहे.

**बद्धकोष्ठता असणाऱ्यांसाठी फायदेशीर –**
जर तुम्हाला बद्धकोष्ठता असेल तर मनुके खूपच फायदेशीर आहेत. बद्धकोष्ठतेची समस्या दूर करण्यासाठी मनुके एकप्रकारचे वरदान आहे. मनुक्यांना भिजवून खाल्ल्याने अधिक फायदा होतो.

**वजन कमी करण्यासाठी –**
मनुक्यातील नैसर्गिक साखर तुमच्या शरीराला नुकसान पोहचवत नाही. यामुळे याचे नियमित सेवन केल्याने तुमचे वजन देखील कमी होते.

**हाडे मजबूत होतात –**
हाडे मजबूत करायची असतील तर मनुक्यांचे सेवन नक्की करा. मनुक्यात कॅल्शियमचे प्रमाण अधिक असते. त्यामुळे याचे सेवन दररोज करावे.

# फोन चोरी झाल्यास अशा प्रकारे करा बँक डिटेल्स आणि मोबाईल वॉलेटचे रक्षण

तुमचा फोन चोरीला गेल्यास सर्वप्रथम तुमचं सिम कार्ड ब्लॉक करा. तसेच मोबाईल बँकिंग, यूपीआय पेमेंट आणि मोबाईल वॉलेट ब्लॉक करा. फोन चोरी झाल्याची तक्रार नजीकच्या पोलीस स्टेशनमध्ये करायला विसरू नका.

**हल्ली** चोर तुमचा फोन मिळाल्यावर फक्त एकच गोष्ट शोधतात ते म्हणजे तुमचे बँक डिटेल्स. सध्या डिजिटल पेमेंट होत असल्यामुळे एकाच डिव्हाइसमध्ये वेगवेगळ्या ॲप्सचा समावेश असतो. स्मार्टफोन चोरण्यासाठी या डिजिटल वॉलेटपर्यंत पोहोचणं इतकं कठीण नाही. अशा अनेक वाईट घटना देखील घडल्या जिथे फोन चोरीला गेल्यावर बँक डिटेल्स मिळवून चोराने बँक अकाऊंट रिकामं केलं.

अशा प्रकारच्या धोक्यापासून वाचण्यासाठी काही गोष्टी लक्षात ठेवल्या पाहिजेत आणि फोन चोरीला गेल्यावर त्या केल्या पाहिजेत. जर तुमचा फोन हरवला किंवा चोरीला गेला तर तुम्ही पुढील पद्धती अवलंबून तुमच्या फोन किंवा त्यातील डेटाचा गैरवापर टाळू शकता.

**सिम कार्ड ब्लॉक करा**
फोन हरवल्यावर फोन नंबरचा गैरवापर टाळणं अत्यंत महत्त्वाचं आहे. सिम कार्ड ब्लॉक केल्यास फोनवरील प्रत्येक ते ॲप ब्लॉक करता येतात, जे ओटीपीच्या माध्यमातून ॲक्सेस केले जाऊ शकतात. तुम्ही नवीन सिम कार्डवर जुना नंबर मिळवू शकता. त्यासाठी काही वेळ लागू शकतो, परंतु तुमच्या प्रायव्हसीसाठी आणि मोबाईल वॉलेटच्या सुरक्षेसाठी सिम कार्ड ब्लॉक करणं अत्यंत आवश्यक आहे.

**मोबाईल बँकिंग सर्व्हिस बंद करा**
फोन चोर तुमचे बँक डिटेल्स सहज मिळवू शकतो, त्यामुळे बँक सर्व्हिस तत्काळ बंद करणं आवश्यक आहे. तुमचे सिम कार्ड आणि मोबाईल बँकिंग ॲप सिंक असतात, त्यामुळे रजिस्टर्ड नंबरवरील ओटीपीविना कोणीतही रक्कम ट्रान्सफर करणं कठीण आहे. परंतु फोन हरवल्यावर दोन्ही ब्लॉक करणे उत्तम.



**यूपीआय पेमेंट डीॲक्टिव्हेट करा**
जेव्हा तुम्ही ऑनलाइन बँकिंग सेवेपर्यंत पोहचू देत नाही तेव्हा चोर इतर मार्ग शोधू लागतो, ज्यात यूपीआयसारख्या पेमेंट ऑप्शनचा समावेश असतो. त्यामुळे थोडासाही वेळ न दवडता यूपीआय पेमेंट डीॲक्टिव्हेट करा. यासाठी तुम्हाला तुमच्या बँकेशी संपर्क साधावा लागेल.

**सर्व मोबाईल वॉलेट्स ब्लॉक करा**
मोबाईल वॉलेट्समुळे आयुष्य सोपं झालंय, परंतु जर तुमचा फोन चुकीच्या हाती पडला तर गुगल पे आणि पेटीएमसारखे मोबाईल वॉलेट महागात पडू शकतात. संबंधित ॲपच्या हेल्प डेस्कशी संपर्क करा आणि जोपर्यंत तुम्ही नवीन डिव्हाइसवर वॉलेट पुन्हा सेट करत नाही, तोपर्यंत ते ब्लॉक करण्यास सांगा.

**पोलिसांत तक्रार करा**
या सर्व स्टेप्स फॉलो केल्यावर पोलीस अधिकाऱ्यांना तुमच्या चोरी झालेल्या डिव्हाइसची माहिती द्या. तुम्ही जवळच्या पोलीस स्टेशनमध्ये फोन चोरी झाल्याची तक्रार करू शकता आणि एफआयआरची प्रत त्यांच्याकडून घेऊ शकता. जर तुमच्या फोनचा गैरवापर झाला किंवा तुमच्या फोनच्या माध्यमातून पैसे चोरीला गेले तर ही कॉपी पुरावा म्हणून वापरता येईल.

# संपादकीय
# लाडक्या बहिणींच्या इमोशनवर मंत्र्यांचं प्रमोशन !



संपादक दिपक मोरेश्वर नाईक



प्रत्यक्षात लाडकी बहीण योजनेमुळे राज्यावर कजार्चा बोजा वाढला हे उघड आहे. त्यामुळे अर्थसंकल्पात या योजनेसाठी खास तरतूद असेल तरच यावर विचार करता येईल, असे स्पष्ट संकेत नव्या सरकारमधील बड्या अधिकार्यांनी आधीच दिले आहेत. यामुळे लाडक्या बहिणी चिंतेत आहेत. कारण योजनेचे पैसे दादा न थांबता दरमहा देतच राहणार या भाबड्या आशेनेच या महिलांनी महायुतीला भरभरून मतं दिली आहेत, पण हा चुनावी जुमला आहे हे त्यांच्या गावीही नाही. यामुळे नव्याने आलेल्या फडणवीस सरकारने सध्या जरी ही योजना सुरूच राहणार असल्याचे आश्वासन दिले असले तरी या योजनेमुळे सरकारी तिजोरीवर पडणारा अतिरिक्त भार सरकारला कितपत आणि कुठपर्यंत झेपेल, हा प्रश्नच आहे. विधानसभा निवडणुकीत महायुतीने देदीप्यमान यश मिळवत डंके की चोट पे महाराष्ट्रात पुन्हा आपला झेंडा रोवला आहे. यामुळे पुढील पाच वर्षे राज्यात महायुतीचेच सरकार राज्य करणार आहे, मात्र महायुतीला भरघोस मतांनी ज्यांनी निवडून दिले त्या लाडक्या बहिणी या विजयाने सुखावल्या नसून धास्तावल्या आहेत. कारण विधानसभा निवडणुकीवेळी तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ह्यमुख्यमंत्री लाडकी बहीणह्ण योजनेची प्रत्यक्षात अंमलबजावणी करून ज्या लाडक्या बहिणींच्या इमोशन जिंकून प्रमोशन मिळवलं त्यांचंच आता डिमोशन झालं आहे. थेट मुख्यमंत्रीपदावरून ते उपमुख्यमंत्री झाले आहेत. यामुळे लाडक्या बहिणींना सरकार आल्यावर १५०० रुपयांवरून २१०० रुपये देण्याच्या शिंदेंनी केलेल्या दाव्याचं काय होणार, अशी चिंता बहिणींना सतावत आहे. त्यातच नवीन मुख्यमंत्री झालेल्या देवेंद्र फडणवीस यांनी पदभार स्वीकारताच लाडक्या बहिणींना २१०० रुपयांसाठी एप्रिलपर्यंत प्रतीक्षा करावी लागणार असल्याचे स्पष्ट केले आहे. यामुळे चुनावी जुगाडासाठी सुरू करण्यात आलेल्या या लाडकी बहीण योजनेत एकनाथ शिंदे खरे दादा की देवाभाऊ याकडे आता महिलांचे लक्ष लागले आहे. कारण प्रत्यक्षात लाडकी बहीण योजनेमुळे राज्यावर कजार्चा बोजा वाढला हे उघड आहे. यामुळे अर्थसंकल्पात या योजनेसाठी खास तरतूद असेल तरच यावर विचार करता येईल, असे स्पष्ट संकेत नव्या सरकारमधील बड्या अधिकार्यांनी आधीच दिले आहेत. यामुळे लाडक्या बहिणी चिंतेत आहेत. कारण योजनेचे पैसे दादा न थांबता दरमहा देतच राहणार या भाबड्या विचारानेच या महिलांनी महायुतीला भरभरून मतं दिली आहेत, पण हा चुनावी जुमला आहे हे त्यांच्या गावीही नाही. यामुळे नव्याने आलेल्या फडणवीस सरकारने सध्या जरी ही योजना सुरूच राहणार असल्याचे आश्वासन दिले असले तरी या योजनेमुळे सरकारी तिजोरीवर पडणारा अतिरिक्त भार सरकारला कितपत आणि कुठपर्यंत झेपेल, हा प्रश्नच आहे. लाडकी बहीण योजना कायम राहावी यासाठी एकनाथ शिंदेच मुख्यमंत्रीपदी राहावे यासाठी अनेक महिलांनी देवाला साकडे घातले. होम हवनही केले, पण मुख्यमंत्रीपदाच्या खुर्चीवर देवेंद्र फडणवीस बसलेत. एवढेच नाही तर त्यांनी नियम आणि निकष पाळून योग्य अर्जदार महिलांना २१०० रुपये देणार, असे आश्वासनही दिले आहे. यामुळे निवडणुकांआधी एकनाथ शिंदे यांनी ज्या सढळ हाताने लाडकी बहीण योजनेचे पैसे सरसकट अर्जदार महिलांच्या खात्यात टाकले तसे यापुढे होणार नाही. उलट बरेच अर्ज या निकषात बसले नाही तर बाद होणार हे नक्की. असे प्रकार मते मिळवण्यासाठी महिलांच्या योजना राबवर्णाया राज्यांमध्ये सतत घडत आहेत. याच पार्श्वभूमीवर गेल्या काही वर्षांत देशात महिला मतदारांचा टक्काही वाढला असून राजकारण्यांचे लक्ष आता या महिला वोट बँकेने वेधले आहे. पुरुष मतदारांच्या तुलनेत महिला मतदारांना आपल्याकडे खेचणे सोपे आहे हे राजकारणी जाणून आहेत. सामान्यपणे पुरुष मतदार मत देताना तो पक्ष आणि त्यांची धोरणे, त्यांच्या योजना, त्यांच्या सरकारमध्ये मिळालेला टॅक्स बेनीफिट याचा सारासार विचार करून मत देतो, मात्र महिला मतदार याच्या अगदी विरुद्ध दिशेने वरवरचा विचार करून भावनिक दृष्टिकोनातून आपला नेता निवडतात हे गेल्या काही वर्षांत दिसून आले आहे. मध्य प्रदेशमध्ये भाजपने लाडली बहना योजना राबवली होती आणि महिलांची भरघोस मतेही मिळवली. त्यासाठी महिलांच्या दैनंदिन गरजांचा विचार करण्यात आला होता. वाढत्या महागाईच्या झळांनी महिलांचे किचन बजेट कोलमडलेले असताना स्वयंपाकाच्या गॅसच्या किमती कमी करून महिलांचा विश्वास जिंकण्यात भाजप यशस्वी झाले, तर दुसरीकडे काँग्रेसनेही महिला मतदारांकडे लक्ष केंद्रित केले. आर्थिक सक्षमतेसह अनेक योजना राबवण्याचे आश्वासन महिलांना दिले. यामुळे महिला वोटर्सची मोठ्या पक्षांना मिळणारी पसंती पाहून अनेक राज्यांतील प्रादेशिक पक्षांनीही आपला मोर्चा महिलांकडे वळवला. सत्तेत आल्यास अमुक तमुक देण्याच्या आश्वासनांच्या खैराती महिलांवर करण्यात आल्या. यामुळे फक्त एक मत देण्याच्या मोबदल्यात कुठलेही कष्ट न करता मिळर्णाया पैशांपुढे महिला अक्षरशः झुकल्या आणि जो पैसे देणार तोच आपला कैवारी असल्याचा समज करून घेऊन महिलांनी बरेच वेळा नको त्या नेत्यांच्या झोळीत मते टाकली.

परिणामी मत देण्याच्या मोबदल्यात इनडायरेक्ट पैसे आणि इतर योजनांचा लाभ मिळतो, असा संदेश घराघरापर्यंत पोहचला. हे चित्र इतर राज्यांत लोकसभा निवडणुकांमध्ये पाहायला मिळाले होते, पण तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनी महाराष्ट्रात विधानसभा निवडणूक काळात मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना आणली. त्यानंतर राज्यात पहिल्यांदाच दरमहा १५०० रुपये वाटर्णाया भावावर बहिणींनी अक्षरशः जीव ओवाळून टाकल्यासारखे मतदान केल्याचे सगळ्यांनी पाहिले.

बाजूच्या झारखंडमध्येही निवडणुका डोळ्यांसमोर ठेवत मैया सन्मान योजना राबवण्यात आली. त्यालाही महिलांनी भरघोस प्रतिसाद देत हेमंत सोरेन यांना विजय मिळवून दिला. बंगालमध्येही तृणमूल काँग्रेसने २०२१ मध्ये महिला मतदारांना आकर्षित करण्यासाठी लक्ष्मी भंडार योजना आणली होती. त्यात सामान्य गटातील महिलांना दरमहा १००० रुपये आणि अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातीमधील महिलांसाठी १,२०० रुपयांची तरतूद केली होती. २०२४-२५ पर्यंत योजनेचा लाभ देण्याचा दावा तृणमूलने केल्याने महिला ममता बॅनर्जी यांच्याकडे आकर्षित झाल्या. जर दीदीला मतदान केले आणि जिंकून दिले तर पैसे कायम मिळत राहणार हाच विचार महिलांनी केला, पण विशेष म्हणजे अनेक राज्यांत अशा प्रकारे योजनांच्या नावाखाली महिलांना सरळ सरळ पैसे वाटणे ही राजकीय खेळी असल्याचे महिलांना कळत नाही. याच ट्रेंडमुळे देशात गेल्या वर्षी ९६.८८ कोटी नवीन मतदारांची नोंदणी झाली. यात महिलाच अधिक असल्याने २०१९ साली महिला मतदारांचा जो आकडा ४३ कोटी होता तो २०२४ लोकसभा निवडणुकांपर्यंत ४७ कोटींवर येऊन पोहचला. यामुळे सगळ्याच पक्षांचे लक्ष महिला मतदारांनी वेधले. गेल्या पाच वर्षांत ज्या महत्त्वाच्या २३ राज्यांमध्ये विधानसभा निवडणुका झाल्या त्यापैकी १८ राज्यांत महिला मतदारांची वाढती संख्या आश्चर्यकारक आहे, असे एसबीआयच्या एका अहवालात नमूद करण्यात आले आहे. प्रामुख्याने केरळ, नागालँड, आंध्र प्रदेश, तामिळनाडू, पुद्दुचेरी, गोवा या राज्यांमध्ये महिला मतदारांची वाढती आकडेवारी विचार करायला लावणारी आहे. हेच ईशान्येकडील मणिपूर, मेघालय, मिझोराम आणि नागालँडमध्ये पाहायला मिळत असून पुरुषांच्या तुलनेत महिला मतदार वाढत आहेत, पण योजनांचा हा जुमला कायम करता येत नाही, तर तो त्या त्या निवडणुका डोळ्यांसमोर ठेवतच केलेला असतो हे भोळ्या बायांना कळायला हवं. कारण राजकारण्यांना याची सवय असते. निवडणुकीवेळी नेतेमंडळी जनतेला भरमसाठ आश्वासने देतात. भोळी भाबडी जनताही त्यावर विश्वास ठेवते आणि मत देते, पण जिंकून आल्यावर नेत्यांना मात्र या आश्वासनांचा सोयीस्कररित्या विसर पडतो हे काही नवीन नाही. यामुळे कालांतराने जनताही नेत्यांची आश्वासने विसरते आणि नंतर पुन्हा त्यांच्या भूलथापांना बळी पडून मतदान करते. महाराष्ट्रात महायुतीचे सरकार असेही आलेले आहेच.

## जननदराच्या प्रश्नाचा राज्यागणिक वेगळा विचार व्हावा...

सरसंघचालक मोहन भागवत यांनी प्रत्येक जोडप्याने किमान तीन मुले होऊ देणे आवश्यक आहे, असे मत व्यक्त केल्यामुळे नव्या चचेर्ला तोंड फुटले आहे. खरेतर मुळात त्यांनी एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे की कोणतेही जोडपे एखादा नेता सांगतो म्हणून किंवा एखाद्या राष्ट्रीय कार्यक्रमाला प्रतिसाद द्यायचा म्हणून कमी किंवा जास्त मुले जन्माला घालत नसते. तो त्यांचा व्यक्तिगत तसेच कौटुंबिक मुद्दा असतो. तरीही हा मुद्दा बाजूला ठेवून सरसंघचालकांच्या विधाचा परामर्श घेऊ या. प्रत्येक जोडप्याने तीन मुले जन्माला घालावीत हा मुद्दा सरसंघचालकांनी घटत्या जनन दराबाबत चिंता व्यक्त करताना मांडला असला आणि देशाची लोकसंख्या कमी होऊ नये यासाठी हा उपाय सुचवला असला तरी आधीच लोकसंख्येबाबत जगात पहिल्या क्रमांकावर असलेल्या देशात अधिक मुले जन्माला घालण्यासाठी प्रोत्साहन देणे हे एक प्रकारे अराजकाला आमंत्रण देणारेच असू शकते.

विकसित देशांमध्ये जनन दर घटणे ही एक मोठी समस्या आहे आणि तिथे जनन दर वाढवण्यासाठी प्रोत्साहन दिले जाते हे खरे असले तरी १४० कोटींच्या देशाला हा असा विचार करणे संकटांना आमंत्रण देणारे ठरू शकते. त्यामुळे लोकसंख्यावाढीला आळा घालणे आणि जनन दर घटू न देणे अशी तारेवरची कसरत आपल्याला करावी लागणार आहे. त्यासंदर्भात वेगवेगळ्या पातळीवर काय चर्चा केली जात आहे ते पाहणे उद्बोधक आहे. मुळात लोकसंख्येबाबत गेले काही दिवस पुन्हा पुन्हा होणाऱ्या चर्चेला संभाव्य जनगणनेचा तसेच त्यानंतर होणाऱ्या मतदारसंघांच्या पुनर्रचनेचा संदर्भ असू शकतो हे आपण लक्षात घेतले पाहिजे. मतदारसंघांच्या पुनर्रचनेमुळे लोकसंख्येवर तुलनेत नियंत्रण मिळवलेल्या दक्षिणेतील राज्यांचे लोकसभेतील प्रतिनिधित्व कमी होण्याची शक्यता असल्यामुळे तमिळनाडू तसेच आंध्र प्रदेशच्या मुख्यमंत्र्यांनीही आपल्या राज्यातील जनतेला लोकसंख्यावाढ करण्याचा सल्ला द्यायला हवा असे म्हटले आहे. अर्थात ही विधाने आणि सरसंघचालकांचे विधान भारतीय जनता गांभीयार्ने घेणार नाही, अशी आशा आहे. कारण लोकसंख्यावाढ हा आजच्या काळात मुळातच माणसाच्या जीवनातल्या आर्थिक, सामाजिक, राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक अशा सगळ्या पैलूंवर परिणाम करणारा घटक आहे.

दुसरा मुद्दा असा की केंद्राकडून राज्यांना मिळणारा संसाधनांच्या वाट्यात त्या त्या राज्याच्या लोकसंख्येचा मुद्दा महत्त्वाचा ठरतो. ज्या राज्यांची लोकसंख्या जास्त त्यांना जास्त निधी मिळतो. म्हणजे जी राज्ये लोकसंख्येला आळा घालण्यासाठी काहीच प्रयत्न करत नाहीत, त्यांचा फायदा होतो आणि तसे प्रयत्न करणाऱ्या राज्यांच्या वाट्याला मात्र अपुरा निधी येतो. त्यामुळे राज्ये आणि त्यांची लोकसंख्या हा यापुढील काळात चचेर्चा, वादाचा मुद्दा ठरू शकतो. २०७० पर्यंत भारताची लोकसंख्या १७० कोटींपर्यंत जाईल आणि तिथून ती कमी व्हायला सुरूवात होईल, असे मानले जाते. लोकसंख्या वाढ ही प्रजनन दराच्या माध्यमातून मोजली जाते.

प्रजनन दर म्हणजे एका स्त्रीला होणारी मुले. भारताचा जननदर २.१ वरून २ वर आला आहे. सध्याच्या काळात आपली दोन तृतीयांश लोकसंख्या कमी जनन दर असलेल्या राज्यांमध्ये राहते. तर उरलेली लोकसंख्या जास्त जनन दर असलेल्या राज्यांमध्ये राहते.

राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्वेक्षणानुसार भारतात वेगवेगळ्या राज्यांमध्ये वेगवेगळा जनन दर (१.५ ते ३) आहे. त्यामुळे सरसकट सगळ्यांना जास्त मुले जन्माला घालण्याचा सल्ला न देता, ज्या राज्यात तो कमी आहे, तिथे तो वाढावा तर जिथे जास्त आहे, तिथे कमी करावा असा सल्ला देणे योग्य ठरेल. कारण लोकसंख्या जास्त असेल तर तेवढ्या लोकसंख्येच्या पोटापाण्याची सोय करण्यासाठी आर्थिक वाढीचा वेगही तेवढा असायला हवा. काही राज्यांचा जननदर कमी आहे, कारण त्या राज्यांना कुटुंब मोठे असण्याचे तोटे समजले आहेत. त्यांना कुटुंब वाढवायला सांगणे चुकीचे ठरू शकते. शिवाय आता त्यांना पुन्हा मोठ्या कुटुंबाकडे वळवणे कठीण ठरू शकते. त्यामुळे जिथं जननदर जास्त आहे, अशा राज्यांना स्त्री सक्षमीकरणाच्या, उत्तम आरोग्या कार्यक्रमांच्या माध्यमातून तो कमी करण्याकडे वळवणे हाच व्यवहार्य उपाय ठरू शकतो. आपल्या देशात सध्या केरळ, कर्नाटक, तममिळनाडू, पंजाबसारख्या राज्यांची जनन क्षमता १.९ आहे. तर बिहार, उत्तर प्रदेश आणि झारखंड यांसह पाच राज्यांचा जनन दर २.१ किंवा त्याहून जास्त आहे. त्यामुळे जास्त जननदर असलेल्या राज्यांवर लक्ष केंद्रित करणे हेच जास्त योग्य ठरेल. जनन दर वाढणे किंवा कमी होणे या संदर्भातील दृष्टिकोनाला आणखी एक पैलू आहे तो मनुष्यबळाचा. जनन दर कमी होत गेला म्हणजे नवे जीव जन्माला येण्याचे प्रमाण घटत गेले की त्या समाजातील तरुणांची संख्या झपाट्याने कमी होऊन वृद्धांची संख्या वाढत जाते. वृद्ध हे अनुत्पादक गटात मोडत असल्यामुळे त्या समाजाची उत्पादकता कमी होण्याचा धोका असतो. म्हणजे चांगली लोकसंख्या हे मनुष्यबळ पण तीच वृद्ध झाली की ओझे ठरण्याची शक्यता निर्माण होते. पण जनन दर जास्त असेल तर या वाढत्या लोकसंख्येला जगवायचे कसे हा प्रश्न उपस्थित होऊ शकतो. त्यामुळे या प्रश्नाचे मोहन भागवत करतात तसे सरसकटीकरण करणे धोक्याचे ठरू शकते.

# वसई विरार शहर महानगरपालिका
## प्रभाग समिती (बी) विरार पूर्व

मुख्य कार्यालय - विरार, दुरध्वनी - ९५२५०-२४०२१७९/२४०३४४२/२४०२५६३

जावक क्र. वविशम /कर/१२५८/२०२४-२५

दिनांक - १०/१२/२०२४

### जाहिर नोटीस

महाराष्ट्र मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४६९ अन्वये जाहिर नोटीस खालील मालमत्तेच्या हस्तांतरण संबंधाने वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती बी कार्यालय नालासोपारा येथे प्राप्त झालेल्या मालमत्ता धारकाच्या प्रकरण परत्वे नोटीसीनुसार सदर हस्तांतरण संर्दभात कोणत्याही हितसंबंधाने हरकत अगर आक्षेप असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांच्या आत हितसंबंधाच्या व हरकतीच्या लेखी पुराव्यासह वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती बी कार्यालय विभागीय कार्यालय विरार येथे लेखी स्वरुपात हरकत नोंदवावी अन्यतः कर वसुलीच्या सोयीसाठी सदर हस्तांतरण करुन महानगरपालिका दप्तरी या बाबतची नोंद घेतली जाईल.

| अ.क्र. | दिनांक | अनुसुचित दोन / तीन मधील नोटिसीची मालमत्ता क्र. | वॉर्ड क्र. | ज्याच्या नावे मालमत्ता आहे त्याचे म्हणजे मालमत्ता विकणा-याचे नाव किंवा अभिहस्तांकन कर्त्यार्चे नाव | खरिददाराचे किंवा अभिहस्तांकन नाव |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 06/11/24 | 844/178 | 06 | सूर्यकांत रघुनाथ मांजळकर | सुषमा शंकर कोळे |
| 2 | 06/11/24 | 1539/9 | 06 | बबिता बबन सावंत | ज्ञानेश्वर रामचंद्र मांडवकर |
| 3 | 06/11/24 | 1639/128 | 06 | संतोष गुंजाळ | विठ्ठल वसंत राणे |
| 4 | 06/11/24 | 1624/34 | 06 | शंकर तानू फेफडे | प्रसाद भागोजी फेफडे |
| 5 | 06/11/24 | 1639/109 | 06 | प्रकाश सोणू म्हापणकर | कल्पना अखिलेश मिश्रा |
| 6 | 06/11/24 | 2102/16 | 06 | अरविंद अर्जुन कविठिया | लिलावतीदेवी अर्जुन कुशवाह |
| 7 | 06/11/24 | 1909/24 | 06 | रेश्मा दत्ताराम कळसुलकर | रुपेश राजेंद्र नाईक / स्वरुपा राजेंद्र नाईक |
| 8 | 06/11/24 | 2119/34 | 06 | शाईन जहिर शेख | मयूर रत्नोजी बाणे |
| 9 | 06/11/24 | 1728/8 | 06 | मारिओ डोमणिक डिसोझा | किशोर बाळकृष्ण बाईग/ काव्या किशोर बाईग |
| 10 | 06/11/24 | 1095/21 | 06 | फ्रान्सिस पिटर डिसोझा | वैभव वसंत सकपाळ / वैशाली वसंत सकपाळ |
| 11 | 06/11/24 | 1704/28 | 06 | ओमकार डेव्हलपर्स अँड बिल्डर्स | उत्तम पांडुरंग कानडे / संतोष पांडुरंग कानडे |
| 12 | 06/11/24 | 2326/68 | 06 | विकास नगरी डेव्हलपर्स | अमित अनंत पाडावे |
| 13 | 06/11/24 | 2326/92 | 06 | विकास नगरी डेव्हलपर्स | राजेश भानुराम घाणेकर |
| 14 | 06/11/24 | 2326/87 | 06 | विकास नगरी डेव्हलपर्स | निलेश शांताराम हरवडे |
| 15 | 06/11/24 | 2326/91 | 06 | विकास नगरी डेव्हलपर्स | शुभम भरत आंबेरकर |
| 16 | 06/11/24 | 2326/82 | 06 | विकास नगरी डेव्हलपर्स | सुभाष सुरेश उदेग |
| 17 | 06/11/24 | 2326/77 | 06 | विकास नगरी डेव्हलपर्स | सुनिल यशवंत पाडावे |
| 18 | 06/11/24 | 2326/79 | 06 | विकास नगरी डेव्हलपर्स | रिया राकेश घाणेकर |
| 19 | 08/11/24 | 2115/29 | 06 | मंगेश गंगाराम रहाटे | राशी मंगेश रहाटे |
| 20 | 08/11/24 | 366/3 | 06 | कृष्णा ओमप्रकाश मौर्या | सतीश शंकर मंदाडकर |

सही /-

प्र. सहा. आयुक्त

प्रभाग समिती (बी) विरार पूर्व

वसई-विरार शहर महानगरपालिका


# पर्यावरणाचे नियम धाब्यावर
## कांदिवलीतील विकासकाला पुन्हा नोटीस

**■मुंबई :** वायू प्रदूषणाचे नियम न पाळणाऱ्या कांदिवलीतील एका विकासकाला पालिका प्रशासनाने काम थांबवण्याची नोटीस पाठवली आहे. जानेवारी महिन्यातही पालिकेने या विकासकाला नोटीस पाठवली होती. आता पुन्हा एकदा नोटीस पाठवण्यात आली असून नियमांचे पालन होत नाही तोपर्यंत काम थांबवण्याचे आदेश दिले आहेत. तसेच नियमांचे पालन न केल्यास नियमानुसार कारवास किंवा दंड याबाबतची शिक्षा करण्याचा करण्याचा इशाराही देण्यात आला आहे.

गेल्या दोन तीन वर्षांपासून हिवाळा जवळ आला की मुंबईतील प्रदूषणात वाढ होते आहे. त्यामुळे दोन वर्षांपूर्वी पालिका प्रशासनाने प्रदूषण नियंत्रणात आणण्यासाठी नियमावली तयार केली होती. बांधकामाच्या ठिकाणी कोणती खबरदारी विकासकाने घ्यायला हवी याबाबतही नियमावली बंधनकारक करण्यात आली होती. त्यावर लक्ष ठेवण्यासाठी पालिका प्रशासनाने विभागांतर्गत पथकेही तयार केली आहेत.या पथकांनी केलेल्या पाहणीत चारकोपमधील एका विकासकाने नियमांचे पालन केले नसल्याचे आढळून आले होते.

या ठिकाणी चाळीस मजली इमारतीचे बांधकाम सुरू असून इमारती भोवती नियमानुसार हिरव्या रंगाचे कापड नाही, सभोवती पत्र्यानी जागा झाकलेली नाही, धूळ उडू नये म्हणून यंत्रणा नाही, राडारोडा उघड्यावरच ठेवलेला आहे अशा अनेक त्रुटी यावेळी आढळल्या होत्या. त्यामुळे आर दक्षिण विभागाने या विकासकाला नोटीस पाठवली आहे.

दुस[illegible]यांदा नोटीस पाठवल्यामुळे त्यात मुंबई महापालिका अधिनियमाच्या ४७५ कलमांतर्गत कारावास किंवा दंड यापैकी एक शिक्षा करण्याचा इशारा दिला आहे. पाच ते पंचवीस हजाराचा दंड किंवा एक महिन्याचा कारावास अशी तरतूद या कलमांतर्गत असल्याचे या नोटीशीत म्हटले आहे.



**काम थांबविण्याचे आदेश**

या विकासकाने बांधकामाच्या ठिकाणी कोणतेही नियम पाळले नसल्याच्या तक्रारी पालिका प्रशासनाकडे आल्या होत्या. त्यामुळे आर दक्षिण विभागाच्या पथकाने घटनास्थळी जाऊन पाहणी केली असता नियम पाळले नसल्याचे आढळून आले. त्यामुळे या विकासकाला पुन्हा एकदा काम थांबवण्याची नोटीस धाडण्यात आली आहे. पर्यावरण नियमांचे पालन होत नाही तोपर्यंत काम थांबविण्याचे आदेश या नोटीसीद्वारे देण्यात आले आहेत.

# ‘लाडकी बहीण’ योजनेच्या सर्व अर्जांची छाननी
## वाढत्या तक्रारींच्या पार्श्वभूमीवर आदिती तटकरेंची घोषणा

**■ मुंबई :** विधानसभा निवडणूक निकालांना ‘कलाटणी’ देणाऱ्या ‘मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण’ योजनेलाच कलाटणी मिळणार आहे. अडीच लाखांपेक्षा जास्त वार्षिक उत्पन्न तसेच घरात चारचाकी वाहन असलेल्या महिलाही योजनेचा लाभ घेत असल्याच्या तक्रारी असून त्यामुळे आता अर्जांची छाननी केली जाणार आहे. छाननीनंतर नियमबाह्यपणे अर्ज बाद केले जातील, अशी माहिती माजी महिला व बालकल्याण मंत्री आदिती तटकरे यांनी ह्यलोकसत्ताह्ला दिली. यामुळे १५ ते २० टक्के, म्हणजे ३५ ते ५० लाख महिलांना लाभावर पाणी सोडावे लागण्याची शक्यता आहे.

प्रारंभी कुटुंबातील केवळ एका महिलेसाठी असलेली ही योजना नंतर मतांच्या बेगमीसाठी २१ ते ६५ वय असलेल्या कुटुंबातील सर्व महिलांसाठी लागू करण्यात आली. महिलेचे बँक खाते आणि कुटुंबाचे एकूण उत्पन्न अडीच लाखांपेक्षा कमी या दोन प्रमुख अटी होत्या. राज्यातील पात्र वयोगटातील चार कोटी ७ लाख महिला मतदारांपैकी दोन कोटी ४७ लाख महिलांनी योजनेसाठी अर्ज केले होते. राज्य सरकारने या योजनेसाठी एकूण ४६ हजार कोटी रुपयांची तरतूद केली आहे. निवडणूक काळात अर्ज दाखल केलेल्या १३ लाख महिलांचे बँक खाते आधार कार्डशी जोडण्यात आले आहेत. मंत्रिमंडळ बैठकीत लवकरच लाभार्थींना डिसेंबरचा हप्ता देण्याच्या प्रस्तावास मंजुरी दिली जाईल. दहा लाख रुपयांचे उत्पन्न घेणाऱ्या अनेक महिला या योजनेचा लाभ घेत असल्याचे निदर्शनास आले आहे. खऱ्या गरजवंतांनाच रक्कम मिळावी, या उद्देशाने पुढील तीन महिन्यांत अर्जांची छाननी केली जाईल आणि अधिक उत्पन्न असलेल्या महिलांची नावे योजनेतून वजा केली जातील, अशी माहिती मंत्रालयातील अधिकाऱ्यांनी दिली.



महायुती सरकारच्या शपथविधी सभारंभानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ह्यलाडकी बहीण योजनाह्न कायम राहणार असल्याचे जाहीर केले. तसेच आर्थिक नियोजनात योग्य प्रकारे सुसूत्रता आल्यानंतर वाढीव हप्ता दिला जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले. त्याच वेळी निकषाबाहेरील महिला योजनेचा गैरफायदा घेत असल्याच्या अनेक तक्रारी आल्याची माहिती आहे. त्यामुळे अर्जांची छाननी सुरू करण्यात आली असून २ कोटी ३४ लाख लाभार्थींपैकी १५ ते २० टक्के महिला अपात्र ठरण्याची शक्यता आहे.

# देशातील ६० जिल्हे नक्षलमुक्त ? जाणून घ्या, देशातील नक्षलवादाची स्थिती

**नक्षलग्रस्त जिल्ह्यांतील विकास**

नक्षलग्रस्त जिल्ह्यांतील विविध विकास योजनांसाठी २०१९ ह्न २० ते २०२३ ह्न २४, या पाच वर्षांच्या कार्यकाळात ४३५०.७८ कोटी रुपये खर्च करण्यात आले. तर नक्षलवादाच्या विरोधात काम करणाऱ्या केंद्रीय संस्थांच्या पायाभूत सुविधा मजबूत करण्यासाठी ५६०.२२ कोटी रुपये खर्च करण्यात आले. नक्षलग्रस्त भागात १४,५२१ किलोमीटरचे रस्ते तयार करण्यात आले. दूरसंचार व्यवस्था अधिक मजबूत करण्यासाठी ६५२४ टॉवर उभारण्यात आले. भागात ५७२१ पोस्ट कार्यालये सुरू करण्यात आले. प्रमुख ३० नक्षलग्रस्त जिल्ह्यांत १००७ बँकेच्या शाखा आणि ९३७ एटीएम सुरू केली. नक्षलग्रस्त ४६ जिल्ह्यांत ४९ कौशल्य विकास केंद्र सुरू केले. १७८ एकलव्य मॉडेल आश्रम शाळा सुरू केल्या. केंद्रीय सुरक्षा दल, राज्य सरकारच्या पोलिस दलाकडून स्थानिक लोकांशी सतत चर्चा, संवाद घडवून आणला. जेणेकरून स्थानिकांना विकासाच्या नव्या संधी, रोजगार मिळाल्यामुळे स्थानिक नक्षलवादापासून दूर गेले.



**■ मुंबई :** गत पाच वर्षांत चंद्रपूरसह देशातील ६० जिल्हे नक्षलमुक्त केल्याचे केंद्रीय गृह मंत्रालयाने म्हटले आहे. आजघडीला एकूण ३८ जिल्हे नक्षलग्रस्त असून, तेही लवकरच नक्षलमुक्त होतील, असा दावाही गृह मंत्रालयाने केला आहे. केंद्रीय गृह मंत्रालयाने दिलेल्या माहितीनुसार, देशात आजघडीला एकूण ३८ जिल्हे नक्षलग्रस्त आहे. पण, मागील पाच वर्षांत देशभरातील एकूण ६० जिल्हे नक्षलमुक्त केले आहेत. महाराष्ट्रातील चंद्रपूर जिल्हा नक्षलमुक्त झाल्याचे गृह मंत्रालयाने म्हटले आहे. २०१५ मध्ये नक्षलवादाच्या प्रश्नावर मार्ग काढण्यासाठी राष्ट्रीय धोरण आणि कार्य योजनेला मंजुरी देण्यात आली होती. त्या नुसार सुरक्षेबाबत उपाययोजना, विकास योजना आणि स्थानिक जनतेचे हक्क आणि अधिकारावर भर देण्यात आला. सुरक्षेच्या पातळीवर केंद्रीय सुरक्षा दलाच्या तुकड्या आणि राज्य सरकारच्या पोलिस दलाचे आधुनिकीकरण करण्यात आले. त्यांना प्रशिक्षण, अत्याधुनिक हत्यारे, उकरणे देण्यात आली. गुप्त माहितीचे आदान - प्रदान करण्यात आले. विशेष पोलिस ठाण्याची निर्मिती करण्यात आली. विकासाच्या पातळीवर नक्षलग्रस्त भागात रस्ते, दूरसंचार व्यवस्था आणि वित्तीय मदतीवर भर देण्यात आला. केंद्र - राज्य सरकारच्या विविध उपाययोजनांचा परिणाम म्हणून २०१० च्या तुलनेत २०२३ मध्ये नक्षलवादाच्या घटनांमध्ये ७३ टक्के घट झाली. २०१० मध्ये सुरक्षा दलाच्या १००५ कर्मचाऱ्यांचा मृत्यू झाला होता, २०२३ मध्ये त्यांची संख्या १३८ वर आली. सुरक्षा दलाच्या कर्मचाऱ्यांचे मृत्यूचे प्रमाण ८६ टक्क्यांनी कमी झाले. २०१० मध्ये नक्षलग्रस्त जिल्हे १२६ होते, २०१८ मध्ये ९० आणि २०२१ मध्ये ७० आणि आता एप्रिल २०२४ पर्यंत नक्षलग्रस्त जिल्ह्यांची संख्या ३८ वर आली असल्याचे गृह मंत्रालयाने म्हटले आहे.

# ठाणे जिल्हा पुन्हा गारठला



**■बदलापूर :** फेंगल वादळामुळे गेल्या काही दिवस राज्यात तापमानात वाढ झाली होती. थंडीनंतर अचानक झालेल्या या तापमान वाढीमुळे अनेकांच्या आरोग्यविषयक तक्रारी वाढल्या होत्या. त्यानंतर रविवारपासून तापमानात पुन्हा घट होण्यास सुरुवात झाली. सोमवारी ठाणे जिल्ह्यातील सर्वात कमी तापमान नोंदवले गेले. बदलापुरात ११.३ अंश सेल्सिअस तापमान नोंदवले गेले आहे. तर जिल्ह्यातील सरासरी तापमान आहे १२ अंश सेल्सियस इतके आहे. गेल्या काही दिवसांपासून देशावर फेंगल वादळाचे सावट होते. त्यामुळे राज्यातील काही भागात अवकाळी पावसाचा फटकाही बसला. तर मुंबईसह उपनगरात ढगाळ वातावरण होते. यामुळे तापमानात वाढ झाल्याचे पाहायला मिळत होते. त्यापूर्वी ठाण्यासह आसपासच्या भागात चांगली थंडी जाणवू लागली होती. मात्र ढगाळ वादळामुळे अचानक तापमान वाढल्याने अनेकांना त्याचा त्रास जाणवला. मात्र गेल्या दोन दिवसांपासून तापमानात बदल होत असल्याचे दिसत होते. रविवारी तापमानात चांगली घट पाहायला मिळाली. तर सोमवारी पुन्हा एकदा जिल्ह्यात गारठा जाणवला. डिसेंबर महिन्यातील सर्वात कमी तापमानाची नोंद सोमवारी झाली. सोमवारी जिल्ह्यातील सर्वात कमी तापमान बदलापुरात नोंदवले गेले. बदलापुरात ११.३ अंश सेल्सियस तापमान नोंदवल्याची माहिती खासगी हवामान अभ्यासक अभिजीत मोडक यांनी दिली आहे.

# ‘दोन वर्षांत खड्डेमुक्त मुंबई’चे स्वप्न अधुरेच
## शिंदे सरकारच्या काळात रस्त्यांची 30 टक्केच कामे पूर्ण

**■मुंबई :** दोन वर्षांत मुंबईतील रस्ते खड्डेमुक्त करण्याचे तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे आश्वासन हवेत विरले आहे. शहर भागातील रस्त्याच्या कामांना आणि दुसऱ्या टप्प्यातील कामांना अलीकडेच सुरुवात झाली असून उपनगरांतील कामेही कूर्मगतीने सुरू आहेत. आतापर्यंत पहिल्या टप्प्यातील केवळ ३० टक्के कामे झाली आहेत. मुंबईतील दोन हजार किमी रस्त्यांचे गेल्या काही वर्षांपासून टप्प्याटप्प्याने काँक्रीटीकरण केले जात आहे. यापैकी पन्नास टक्के रस्त्यांचे काँक्रीटीकरण झाले आहे. दोन वर्षांत मुंबईतील रस्ते खड्डेमुक्त करण्याचा संकल्प शिंदे यांनी २०२२ मध्ये सोडला होता व पालिका प्रशासनाला तसे निर्देश दिले होते. त्यानंतर पहिल्या टप्प्यातील तब्बल ६,०७८ कोटींच्या कामांसाठी निविदा मागवण्यात आल्या. त्यातून पाच नामांकित कंत्राटदारांची निवड करून जानेवारी २०२३मध्ये कार्यादेश देण्यात आले. मात्र शहर भागातील रस्त्यांची कामे ऑक्टोबरमध्ये सुरू झाली. तर पूर्व आणि पश्चिम उपनगरांतील कामांची गती कमी आहे. गेल्या दोन वर्षांत पहिल्या टप्प्यातील ४०० किमी रस्त्यांपैकी केवळ ३० टक्के कामे पूर्ण झाली आहेत. एकीकडे ही स्थिती असताना दुसऱ्या टप्प्यातील कामांसाठीही निविदा मागवून ऑगस्ट२०२४ मध्ये कार्यादेश देण्यात आले. पहिल्या टप्प्यातील ३९२ किलोमीटर लांबी रस्त्यांची कामे अर्धवट असताना दुसऱ्या टप्प्यात ३०९ किलोमीटर लांबीच्या रस्त्यांचे काँक्रीटीकरणही ऑक्टोबरपासून सुरू झाले. मात्र ही कामे एकाचवेळी सुरू असल्यामुळे वाहतूक पोलिसांची परवानगी, उपयोगिता वाहिन्या सरकवणे, रस्ते बांधणीपूर्वीची पर्जन्यजलवाहिन्यांची कामे यामुळे वेळ लागत असल्याचे अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे. पहिल्या टप्प्यातील कामांचा कालावधी २०२६ पर्यंत होता. तर दुसऱ्या टप्प्यातील कामांचा कालावधी २०२८पर्यंत आहे. मात्र पहिला टप्पा २०२५ पर्यंत व दुसरा टप्पा २०२७ पर्यंत पूर्ण करण्याचे महत्त्वाकांक्षी उद्दिष्ट ठेवल्याचे महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त अभिजित बांगर यांनी ह्यलोकसत्ताह्ला सांगितले. रस्त्यांवरील खड्ड्यांचे प्रमाण कमी होत असून पावसाळ्यात मुंबईकरांना बदल नक्कीच दिसेल, अशी ग्वाहीदेखील त्यांनी दिली.



**रोज एक किमीचे उद्दिष्ट**

पहिल्या टप्प्यातील कामे ३१ मे २०२५ पर्यंत पूर्ण करण्याचे उद्दिष्ट असल्याचे अतिरिक्त आयुक्त अभिजीत बांगर यांनी सांगितले. त्यासाठी दररोज किमान एक किमीचा रस्ता पूर्ण करण्याचे उद्दिष्ट ठरवण्यात आले असून कंत्राटदारांनाही सूचना दिल्या आहेत. दर आठवड्याला कामाचा आढावा घेतला जात आहे. गेल्या वर्षी ज्या रस्त्यांवर खड्डे होते ते रस्ते प्राधान्याने हाती घेतले जाणार असल्याचे बांगर म्हणाले.

# लोकलमध्ये डोंबिवलीतील प्रवाशांना, मद्यधुंद खासगी सुरक्षकाची दमदाटी



**■ डोंबिवली :** डोंबिवली ते नाहूर दरम्यान लोकलने प्रवास करत असताना गुरुवारी दुपारच्या वेळेत मद्यधुंद अवस्थेतअसलेल्या एका बलवान खासगी सुरक्षा रक्षकाने (बाऊन्सर) लोकलमधील तीन प्रवाशांना किरकोळ कारणावरून दमदाटी करून त्यांना मारण्याची धमकी दिली. तसेच, एका धर्मपंथाच्या भिक्षुकाला जय श्रीराम बोलण्याची सक्ती केली. या विविध कारणांवरून एका जागरूक प्रवाशाने संबंधित खासगी सुरक्षा रक्षका विरुध्द डोंबिवली लोहमार्ग पोलीस ठाण्यात तक्रार केली. पोलिसांनी गुन्हा दाखल करून घेतला आहे. तसेच, संबंधित खासगी सुरक्षा रक्षकाला पोलिसांनी नोटीस देऊन समज दिली. तक्रारदार हे डोंबिवलीत राहतात. ते ज्येष्ठ नागरिक आहेत. गुन्हा दाखल बलवान खासगी सुरक्षा रक्षक हे २८ वर्षांचे असून ते लोढा हेवन भागात राहतात. लोहमार्ग पोलीस ठाण्यातील दाखल तक्रारीतील माहिती अशी, की तक्रारदार गुरुवारी दुपारी चार वाजण्याच्या दरम्यान डोंबिवली ते नाहूर लोकलने प्रवास करत होते. यावेळी त्याच लोकलमध्ये त्यांचे सहप्रवासी, एका धर्मपंथाचे भिक्षुकही प्रवास करत होते. या लोकलच्या डब्यातून बलवान खासगी सुरक्षा रक्षकही प्रवास करत होता. खासगी सुरक्षा रक्षक मद्यधुंद अवस्थेत होता. त्यांनी तक्रारदारासह इतर दोन प्रवाशांबरोबर वाद उकरून काढला. लोकलमध्ये आरडाओरडा सुरू केला. इतर प्रवासी त्याला शांत राहण्याचा सल्ला देत होते. पण सुरक्षा रक्षक ते ऐकण्याच्या मनस्थितीत नव्हता. त्याने तक्रारदारासह त्यांच्या सहप्रवाशाला काहीही कारण नसताना मारण्याची धमकी दिली. तसेच, या लोकलच्या डब्यातून प्रवास करणाऱ्या एक धर्मपंथाच्या भिक्षुकाला जय श्रीराम बोलण्याची सक्ती केली. मद्य सेवन केले असल्याने सुरक्षा रक्षक कोणाचे काही ऐकण्याच्या मनस्थितीत नव्हता. लोकल डब्यात गोंधळ घालून मारण्याची धमकी दिल्याने तक्रारदाराने डोंबिवली लोहमार्ग पोलीस ठाण्यात येऊन त्याच दिवशी रात्री तक्रार केली.

# डोंबिवलीत मालमत्ता कर थकबाकीदारांच्या गाळ्यांना टाळे



**■ डोंबिवली :** वारंवार नोटिसा पाठवूनही अनेक वर्षांच्या थकीत मालमत्ता कराची ४० लाखाहून अधिक रकमेची थकबाकी भरण्यास टाळाटाळ करणाऱ्या चार थकबाकीदारांच्या गाळ्यांना टाळे लावण्याची कारवाई कल्याण डोंबिवली पालिकेच्या ग प्रभागाच्या अधिकाऱ्यांनी शुक्रवारी केली. या दुकानांच्या मालमत्ता कराची थकित रक्कम मालमत्ताधारकांनी विहित वेळेत भरणा केली नाही तर गाळ्यांवर जप्तीची कारवाई करून त्यांचा लिलाव करण्यात येईल, असे ग प्रभागाचे साहाय्यक आयुक्त संजयकुमार कुमावत यांनी सांगितले. डोंबिवलीत ग प्रभाग हद्दीतील दत्तनगर भागातातील दोन गाळेधारकांकडे मालमत्ता कराची एकूण ३४ लाख ३९ हजार ७६७ रुपयांची थकबाकी आहे. उर्सेकरवाडीतील भागातील दोन गाळे धारकांकडे पाच लाख ६६ हजार रुपयांची थकबाकी आहे. ही कराची थकित रक्कम भरणा करण्यासाठी मालमत्ता कर विभागाने मालमत्ता करधारकांना वेळोवेळी नोटिसा पाठविल्या. त्यांच्याकडून विहित वेळेत कर भरणा करण्याची प्रक्रिया करण्यात आली नाही. चार गाळ्यांचे मालक मालमत्ता कर भरण्यास टाळाटाळ करत असल्याने मालमत्ता कर विभागाच्या उपायुक्त स्वाती देशपांडे यांच्या आदेशावरून ग प्रभागाचे साहाय्यक आयुक्त संजयकुमार कुमावत, अधीक्षक ज्ञानेश्वर कंखरे, लिपिक गोविंद पोटे, प्रभाकर कदम, भीमराव बडेकर यांच्या उपस्थितीत चार गाळ्यांना टाळे लावण्याची कारवाई केली.

“मालमत्ता कर वसुलीची मोहीम सुरू करण्यात आली आहे. मालमत्ता कर थकबाकीदारांना पहिले कर भरण्यासाठी नोटिसा पाठविल्या जातात. या नोटिसांप्रमाणे थकबाकीदारांनी कर भरणा केला नाहीतर तर त्यांच्या मालमत्तांना टाळे लावण्यात येते. कर थकबाकीदारांनी कारवाई टाळण्यासाठी लवकरात लवकर कर भरणा करावा.”

**-संजयकुमार कुमावत, साहाय्यक आयुक्त, ग प्रभाग, डोंबिवली.**

# बदलापुरात अतिसारामुळे चिमुकलीचा मृत्यू, एकाच कुटुंबातील ६ जणांना लागण

**■बदलापूर :** गेल्या काही दिवसांपासून राज्यातील वातावरणात सातत्याने बदल होत आहे. त्यातच दिवसा उकाडा आणि रात्री थंडी यामुळे अनेकांना सर्दी, खोकला, ताप असे आजार होताना दिसत आहे. वातावरण बदल आणि प्रदूषणामुळे होणारे आजार तसेच त्यामुळे वाढणाऱ्या रुग्णांची संख्या ही सातत्याने वाढत आहे. त्यातच आता हिवाळा सुरु झाल्याने श्वसनाचे आजार वेगाने वाढत आहे. यातच आता बदलापुरात अतिसारामुळे एका अडीच वर्षीय चिमुकलीचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. यामुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. दरम्यान सध्या अतिसाराची साथ सुरू असून अनेक लहान मुलांना जुलाब उलट्या असे त्रास होत आहे. हा आजार दूषित पाण्यातून होत असल्याचे बोललं जात आहे. बदलापूरच्या चिमुकलीचाही मृत्यू दूषित पाण्यामुळेच झाला असण्याची शक्यता वर्तवली जात आहे. अतिसार किंवा जुलाब हा एक संसर्गजन्य आजार आहे, जो खराब खाण्याच्या सवयी किंवा दूषित पाणी पिण्यामुळे होऊ शकतो. अतिसारामुळे सैलसर पाण्यासारखे पातळ शौचास होणे, पोटात मुरड पडणे किंवा गोळा येणे, मळमळ आणि उलट्या होणे, ताप, थकवा आणि अशक्तपणा जाणवणे, अशी लक्षणे दिसतात.




**अतिसार झाल्यास काय करावे?**

- अतिसाराच्या वेळी शरीरातील पाण्याची कमतरता भरून काढण्यासाठी डफ्र चे सेवन करा.
- केळी खाल्ल्याने पोटदुखी आणि अतिसारापासून आराम मिळतो
- निरोगी पोटासाठी रोज दह्याचे सेवन करणे फायदेशीर असते.
- आल्याचा रस प्यायल्याने पोटदुखीपासून आराम मिळतो.

**नेमकं काय घडलं?**

मिळालेल्या माहितीनुसार, बदलापूरच्या सोनिवली परिसरातील आदिवासी वाडीत गौऱ्या मिरकुटे कुटुंबासह राहतात. त्यांच्या घरातील ६ मुलांना दोन दिवसांपूर्वी अचानक उलट्या आणि जुलाबाचा त्रास सुरू झाला. त्यांची अडीच वर्षांची मुलगी सपना मिरकुटे ही मोठ्या प्रमाणात अतिसार झाला. तिला याचा जास्त त्रास झाला आणि तिची प्रकृती बिघडली. यानंतर तिला उपचारासाठी उल्हासनगरच्या मध्यवर्ती रुग्णालयात दाखल करण्यात आलं. मात्र उपचारादरम्यान तिचा दुर्दैवी मृत्यू झाला. यानंतर कुटुंबातील इतर ५ मुलांनाही उपचारांसाठी उल्हासनगरच्या शासकीय मध्यवर्ती रुग्णालयात दाखल करण्यात आलं.

# प्रभारी आयुक्त रमेश मनाळे यांची समाजमाध्यमावर बदनामी

**■वसई :** वसई विरार महापालिकेचे प्रभारी आयुक्त रमेश मनाळे यांची समाजमाध्यमावर बदनामी करून त्यांच्या पत्नी संदर्भात आक्षेपार्ह संदेश पाठविण्यात आला आहे. याप्रकरणी बोळींज पोलीस ठाण्यात अज्ञात व्यक्तींविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. रमेश मनाळे हे वसई विरार महापालिकेचे प्रभारी आयुक्त आहेत. त्यांनी वसई विरार शहरातील अनधिकृत बांधकामांविरोधात मोठी मोहीम उघडली आहे. त्यामुळे भूमाफिया हवालदिल झाले आहेत. त्यासाठी मनाळे यांना धमकाविण्याचा प्रकार सुरू झाला आहे.

अज्ञात व्यक्तींनी मनाळे यांचा छायाचित्रात फेरफार करून त्यांचे छायाचित्र अश्लील संकेतस्थळावर प्रसिध्द केले. ‘काव्या मेहता’ नावाच्या महिलेच्या बनावट फेसबुकवरून विविध व्हॉटसअपसमूहावर देखील प्रसारित करण्यात आले होते. यानंतर अज्ञात व्यक्तीने मनाळे यांना मोबाईलवर पत्नीबाबत आक्षेपार्ह मजकूर असलेला संदेश पाठवून धमकी दिली. विशेष म्हणजे आरोपींनी मनाळे यांच्या मुळ लातूर गावातील व्हॉटसअप समूहावर हे बदनामीकारक मजकूर प्रसारीत करून त्यांचा मानसिक त्रास देण्याचा प्रयत्न केला आहे. नोव्हेंबर पासून हा प्रकार सुरू होता. अखेर रमेश मनाळे यांनी अज्ञात व्यक्ती आणि फेसबुक प्रोफाईलकर्त्याविरोधात बोळींज पोलीस ठाण्यात तक्रार दिली. या तक्रारीवरून बोळींज पोलीस ठाण्यात भारतीय न्यायसंहितेच्या कलम ३५१ (२), ३५६ (२) तसेच माहिती तंत्रज्ञान अधिनियमाच्या कलम ६६ (सी) ६७ (ए) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मला धमकावण्याचा प्रकार नाही. मात्र आता ते माज्या कुटुंबाला लक्ष्य करत आहे. मात्र या भूमाफियांच्या दबावाला मी बळी पडणार नाही, असे प्रभारी आयुक्त रमेश मनाळे यांनी सांगितले.

# महिलेचा पाठलाग करणाऱ्या रोड रोमिओला चोप, पण पोलिसांकडून कारवाईची उदासीनता?

**■अंबरनाथ :** राज्यात महिला आणि मुलींच्या सुरक्षेवर सातत्याने चर्चा होते. पण तरीही काही ठिकाणी अनपेक्षित आणि वाईट घटना बघायला मिळतात. बदलापुरात तर शाळेतच चिमुकल्या मुलींवर अत्याचार झाल्याचं बघायला मिळालं आहे. याशिवाय अशा अनेक घटना सातत्याने समोर येत असतात. आता अंबरनाथमधून एक धक्कादायक घटना समोर येताना दिसत आहे. एका रोड रोमियोच्या त्रासामुळे पीडित महिला आणि तिचे कुटुंबिय दहशतीखाली असल्याची माहिती मिळत आहे. या रोड रोमियोला स्थानिक नागरिकांनी चोप दिला. तसेच पोलिसांच्या स्वाधीन देखील केलं. पण पोलिसांकडून अपेक्षित कारवाई न होता फक्त एनसी नोंदवून सोडवून दिल्याचा आरोप करण्यात आला आहे. यानंतर संबंधित रोड रोमियोच्या पुन्हा चकरा सुरु झाल्याचा आरोप करण्यात आला आहे. अंबरनाथमध्ये विवाहित महिलेचा पाठलाग करत छेड काढल्याने रोड रोमियोला स्थानिकांनी चोप देत पोलिसांच्या हवाली केलं. मात्र यानंतर पोलिसांनी फक्त एनसी नोंदवून घेत या रोड रोमिओला सोडून दिलं आणि त्याचा आता पुन्हा त्रास सुरू झाल्याची तक्रार पीडित महिलेच्या पतीने केली आहे. या प्रकरणी आता पोलिसांकडून काय भूमिका मांडली जाते? ते पाहणं महत्त्वाचं ठरणार आहे.



हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक ह्न श्री. डॉ. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय ह्न गाळा नं. ४, एन.के.इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र), येथे छापून २, राजाराम सी.एच.एस. लिमिटेड, बंदरवाडी, नवघर रोड, भाईदर (पुर्व), जिल्हा ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिध्द केले. संपादक ह्न श्री. डॉ. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमान पत्रात प्रसिध्द होणा-या बातम्या/लेख/जाहिराती यांची जवाबदारी संबंधीत वार्ताहर, लेखक आणि जाहिरात प्रतिनिधी यांच्यावर राहील.) भ्रमणध्वनी ८४२४९८९८९८ . Email ID : policebatmipatra@gmail.com

Printed, Published and owned by Mr.Dr. Deepak MoreshwarNaik Printed at SOMANI PRINTING PRESS, OFFICE – UNIT NO. 4, N.K.INDUSTRIAL ESTATE, NEAR PRAVASI INDUSTRIAL ESTATE, GATE NO. 2, GOREGAON (E), MUMBAI 400063, MAHARASHTRA, Published At – 2, RajaramChs. Ltd., Bunderwadi, Navghar Road, Bhayander(E), Dist – Thane, Pincode 401105, Maharashtra. Editor – Mr. Dr. Deepak MoreshwarNaik. Mo.8424989898, Email ID: policebatmipatra@gmail.com